

‘‘हम सब को अब अपने क्षेत्रों में उसी प्रकार के समर्पण उत्साह और संकल्प के साथ काम करना होगा जो एक योध्दा को उसकी रणभूमि में उत्साहित और लड़ने को प्रेरित करता हैं, और हमे सिर्फ ये बोलने तक ही सिमित ना रखकर उसे वास्तविकता में कर के दिखाना होगा.’’

– लाल बहादुर शास्त्री



कै. लाल बहादुर शास्त्री व कै. डॉ. शंकररावजी चव्हाण

धर्माबाद शिक्षण संस्थेचे,

# लाल बहादुर शास्त्री महाविद्यालय,

धर्माबाद-४३१८०९, जि. नांदेड

**स्थापना : जून १९६७**

महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील अधिसूचना क्र.U.R.T. 1494/149(149) 94/U.N.I.-3 दिनांक ७ सप्टेंबर १९९४ अन्वये दिनांक १७ सप्टेंबर १९९४ पासून प्रस्थापित व कार्यालयीन आदेश क्र.F.9-9/94 (C.P.P.I.) दिनांक १९ मे १९९८ अन्वये विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता प्राप्त स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडशी संलग्न

## माहिती पुस्तिका

कार्यालयाची वेळ : १०-३० ते ५-३० (रविवार सोडून)

दूरभाष : (०२४६५-२४४१५८)

ईमेल : lbsc_dab@yahoo.com / lbscollegedab67@gmail.com

वेबसाईट : www.lbsmd.ac.in

# प्राचार्यांचे मनोगत

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर विविध प्रांतात जी मोजकी महाविद्यालय सुरू झाली, त्यापैकी सन १९६७ साली धर्माबाद शिक्षण संस्थेचे, लाल बहादुर शास्त्री महाविद्यालय एक आहे. हे महाविद्यालय अर्धशतकाचा कालखंड यशस्वीपणे पुर्ण करुन, आपली दमदार स्वरुपाची वाटचाल करीत आहे. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हे संस्थेचं ब्रिद वाक्य डोळ्यासमोर ठेऊन, ग्रामीण भागात उच्च शिक्षणाचा प्रसार व्हावा या शुध्द हेतूनी व सामाजिक बांधिलकीनी या महाविद्यालयाची सुरुवात झाली. कै.डॉ. शंकररावजी चव्हाण, कै.पद्मश्री शामरावजी कदम, कै.बाबा पाटील बन्नाळीकर, कै.मदनलालजी रांदड, कै.गंगन्नाजी वर्णी, कै.विठ्ठलराव पडगीलवार व समकालीन सर्व शिक्षणप्रेमी सहकार्यांच्या विचारातून ही संस्था व संस्थेचे महाविद्यालय उदयास आले. धर्माबाद परिसरासाठी ही फार महत्वाची ऐतिहासिक घटना आहे.

सन. १९६७ पासून मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यातून अध्यायनसाठी विद्यार्थी मोठ्या संख्येनी महाविद्यालयात येत असतं, आजही जिल्हाभरातून व तसेच विदर्भ, तेलंगणा राज्यातील विद्यार्थी इथे प्रवेश घेतात. गेल्या इतक्या वर्षांच्या परंपरेत, ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी, कामगार, उपेक्षितांची मुलं या महाविद्यालयांनी घडविली आहेत. सामाजिक, राजकीय, आरोग्य, कृषी, उद्योग, क्रीडा, साहित्य, कला, संस्कृती अशा विविध क्षेत्रात दैदिप्यमान असं यश त्यांनी मिळविलं आहेत. धर्माबाद गावाचा व महाविद्यालयाचा लौकिक वाढविला असून, या महाविद्यालयाची ही गौरवशाली परंपरा आजपर्यंत चालू आहे.

कनिष्ठ महाविद्यालय, उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम, वरिष्ठ महाविद्यालय व पदव्युत्तर विभाग, या सर्व विभागातून अध्ययन व अध्यापनाचे काम आमच्या महाविद्यालयात नव्या बदलांना स्वीकारुन केले जाते. साहित्य, सामाजिकशास्त्रे व विज्ञान शाखेतील प्राध्यापकांचे अध्यापनाव्यतिरीक्त केलेले संशोधन देशभरातील व आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन पत्रिकेतून प्रकाशीत होते. हे संशोधन ही आमच्या महाविद्यालयाची स्वतंत्र ओळख आहे.

सर्व स्थरातील बदलांना स्वीकारुन जगताना आमच्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा, त्यांच्या अंगी असलेली प्रतिभा व कौशल्यांना दिशा मिळावी आणि नव्या शैक्षणिक धोरणातील मूल्यांचा स्वीकार करुन विद्यार्थ्यांना जगण्याची नवी दिशा मिळावी, या उद्देशाने महाविद्यालयात अध्यापना केले जाते.

महाविद्यालयासाठी लाभलेला सुंदर निसर्गरम्य परिसर, अध्यायन-अध्यापनातील सर्व उपलब्ध सोयी सुविधा, सर्व कलागुणांन दिशा देणारे समृध्द असे लाभलेले वातावरणा या सर्व घटकांशी ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांनी, या समरस होऊन, सर्व बाबींचा लाभ घ्यावा, स्वतःला घडवावे. आपल्या गावाचे, परिसराचे अर्थात देशाचे नाव लौकिक करावे, ही आमची धारणा आहे. खऱ्या अर्थाने धर्माबाद परिसराच्या उत्थानासाठी पुर्वजांनी दूरदृष्टी ठेऊन उभी केलेली ही धर्माबाद शिक्षण संस्था व या संस्थेचे महाविद्यालय उभारणीतील त्यांचा हेतु पुर्णाथाने सफल झाला असे म्हणता येईल.

राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद
विश्वविद्यालय अनुदान आयोग का स्वायत्त संस्थान
**NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL**
*An Autonomous Institution of the University Grants Commission*

# Certificate of Accreditation

*The Executive Committee of the*
*National Assessment and Accreditation Council*
*on the recommendation of the duly appointed*
*Peer Team is pleased to declare the*
*Dharmabad Shikshan Sanstha's*
*Lal Bahadur Shastri Mahavidyalaya*
*Dharmabad, Dist. Nanded,*
*affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University, Maharashtra as*
*Accredited*
*with CGPA of 2.87 on four point scale*
*at B grade*
*valid up to March 28, 2021*

*Date : March 29, 2016*

*Director*

EC(SC)/14/A&A/33.2

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

## विद्यार्थी कल्याण विभाग

## गौरवपत्र

**लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद ता.धर्माबाद जि.नांदेड** यांना, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या वतीने देण्यात येणारा सन २०१०-२०११ या वर्षाचा उत्कृष्ट वार्षीक अंक पुरस्कार **अक्षर** या वार्षीक अंकास उत्तेजनार्थ पुरस्कार देवून गौरव करण्यात येत आहे.

**प्रा.गणेश शिंदे**
संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग

**डॉ. सर्जेराव निमसे**
कुलगुरु
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ,

दिनांक : २४ सप्टेंबर २०११

सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

### " जागर जाणिवांचा " अभियाना अंतर्गत पारितोषिक

### प्रमाणपत्र

राज्यातील महाविद्यालये व शैक्षणिक संस्थामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांत **स्त्री - पुरुष समानतेची बीजे** रुजविणे आणि **विद्यार्थीनींमध्ये आत्मविश्वास व आत्मनिर्भरता** विकसित होण्याच्या उद्देशाने, विद्यार्थ्यांनी कल्पकता व प्रेरक शक्तीच्या आधारे सुचविलेल्या कार्यक्रमाची निवड करुन ती राबविणे आणि समाजात स्त्री-पुरुष समानता जागृत करण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये

**लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद, नांदेड**

यांनी राबविलेल्या उपक्रमाची **जिल्हास्तरीय "द्वितीय"** पारितोषिकासाठी निवड करण्यात आलेली आहे.

या करिता महाराष्ट्र शासनातर्फे, मान्यवरांच्या उपस्थितीत रोख पारितोषिकासह हे प्रमाणपत्र सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत आहे. सदरचे कार्य यापुढेही असेच सुरु रहावे, या शुभेच्छांसह !

**राजेश अंकुशराव टोपे**
मंत्री
उच्च व तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

दिनांक :२० ऑगस्ट २०१४

---

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

### उत्कृष्ट महाविद्यालय (ग्रामीण विभाग)

सन - २०१०

### विद्यापीठ पुरस्कार

धर्माबाद शिक्षण संस्थेचे

**लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद, जि. नांदेड**

शैक्षणिक क्षेत्रात आपल्या महाविद्यालयाने केलेल्या प्रशंसनीय कार्याच्या गौरवाप्रीत्यर्थ **विद्यापीठ पुरस्कार** देऊन आपणास सन्मानीत करताना आनंद होत आहे.

अभिनंदन!

दिनांक : मे १५, २०१०

कुलगुरू

# लाल बहादुर शास्त्री महाविद्यालय,

धर्माबाद -४३१८०९, जि. नांदेड.

**महाविद्यालयाचे वैशिष्टे :**

१. मागील चौपन्न वर्षांची भव्य व उज्ज्वल शैक्षणिक परंपरा असलेले मराठवाड्यातील नामांकित महाविद्यालय.
२. मिनी विद्यापीठ म्हणून शोभेल असा निसर्गरम्य परिसर.
३. दुर्मिळ व विपूल संदर्भ ग्रंथांचा संग्रह असलेले ग्रंथालय.
४. मुलांचे / मुलींचे स्वतंत्र भव्य वसतिगृह.
५. स्वतंत्र प्रशासकीय इमारत.
६. स्वतंत्र संगणक विभाग.
७. भव्य क्रीडांगण व व्यायामशाळा.
८. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून राज्य व देशपातळीवर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग.
९. एन.सी.सी. विभागाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांची राज्य व देश पातळीवरील निवडीची परंपरा.
१०. विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देणारे व्यासपीठ म्हणून कार्यरत असलेला स्वतंत्र सांस्कृतिक विभाग.
११. सांस्कृतिक विभागाच्यावतीने दरवर्षी विविध व्याख्यानमाला, वादविवाद स्पर्धा, वक्तृत्त्व स्पर्धा तसेच काव्य, कथा, नाट्यलेखन स्पर्धेचे आयोजन.
१२. विद्यार्थ्यांमधील प्रतिभेला अभिव्यक्त करणारे विचारपीठ व महाविद्यालयाचे मुखपत्र म्हणून प्रकाशित होणारा ‘अक्षर’ महाविद्यालयाचा वार्षिकांक.
१३. अनुभवी व उच्च विद्याविभुषित, राष्ट्रीय स्थरावरती संशोधन क्षेत्रात भरीव कामगीरी करणारे प्राध्यापक वृंद.
१४. विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी आधुनिक व सुसज्ज प्रयोगशाळा.
१५. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची पुर्व तयारी करुन घेणारे स्वतंत्र स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र.
१६. स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र ग्रंथालय व अभ्यासिका.
१७. विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र उपहारगृहाची व्यवस्था.
१८. मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहाची व्यवस्था.
१९. दरवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार.
२०. पालक व माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन.
२१. उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाची स्वतंत्र इमारत, अनुभवी शिक्षक व प्रात्यक्षिक अभ्यासाला प्राधान्य.
२२. व्यवसाय अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार व लघुउद्योगासंबंधी कार्यशाळा व अनुभवी व्याख्यात्यांच्या व्याख्यानाचे आयोजन.

# उच्च माध्यमिक ११ वी, १२ वी साठी अभ्यासक्रम

महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यास खालील यादीतूनच विषय निवडून प्रवेश घेता येईल. एकदा निवडलेल्या विषयात पुन्हा बदल करता येणार नाही.

**कला विभाग (ARTS FACULTY)**

**अ. अनिवार्य विषय :**

१. इंग्रजी
२. पर्यावरण शिक्षण
३. सहकार
४. अर्थशास्त्र

**ब. ऐच्छिक विषय :**

१. व्दितीय भाषा : हिंदी/मराठी/संस्कृत (कोणताही एक)
२. इतिहास / संगीत
३. राज्यशास्त्र / संगीत

**वाणिज्य विभाग (COMMERCE FACULTY)**

**अ. अनिवार्य विषय :**

१. इंग्रजी
२. पर्यावरण शिक्षण
३. पुस्तपालन आणि लेखाकर्म (Book Keeping & Accounting)
४. वाणिज्य संघटन व व्यवस्थापन (Organisation of Commerce & Management)
५. सचिवांची कार्यपध्दती (Secretarial Practice)

**ब. ऐच्छिक विषय :**

१. व्दितीय भाषा : हिंदी/मराठी/संस्कृत (कोणताही एक)
२. सहकार (Co-Operation) / अर्थशास्त्र (Economics)

**विज्ञान विभाग (SCIENCE FACULTY)**

**अ. अनिवार्य विषय :**

१. इंग्रजी
२. पर्यावरण शिक्षण
३. भौतिकशास्त्र (Physics)
४. रसायनशास्त्र (Chemistry)

**ब. ऐच्छिक विषय :**

१. व्दितीय भाषा : हिंदी/मराठी/संस्कृत (कोणताही एक)
२. जीवशास्त्र (Biology)
३. गणित व सांख्यिकीशास्त्र (Mathematics & Statistics) / मानसशास्त्र (Psychology)

**टीप :**

१. संगीत व संस्कृत या विषयांना प्रत्येकी किमान २५ विद्यार्थीसंख्या आवश्यक आहे. जर विद्यार्थी संख्या कमी झाली तर विषय बदलून घ्यावे लागतील.

२. संगणकशास्त्र व पीकशास्त्र या विषयांना प्रत्येकी किमान ५० विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळेल.

**११ वी प्रवेशासाठी सूचना**

१. दहावीचा निकाल लागल्यानंतर तीन दिवसांच्या आत नावनोंदणी करणे आवश्यक आहे.

२. प्रवेश क्षमता ११ वी कला २४०, संयुक्त (कला व वाणिज्य) १२०, विज्ञान २४०.

३. नावनोंदणी अर्जाबरोबर गुणपत्रिका तसेच मागासवर्गीय असेल तर जातीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.

४. नावनोंदणी अर्जावरुन गुणवत्ता यादी तयार केली जाईल व त्याप्रमाणे प्रवेश दिला जाईल.

५. एकवेळ एका शाखेचे योग्यता प्रमाणपत्र घेतल्यावर १२ वी मध्ये शाखा बदलता येणार नाही.

६. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात ५० टक्के जागा राखून ठेवण्यात येतात.

७. खुल्या आणि राखीव संवर्गातील उपलब्ध जागांपैकी ३० टक्के जागा त्या-त्या संवर्गातील विद्यार्थिनीसाठी आरक्षित राहतील.

८. प्रवेशासाठी दहा रुपये भरून मिळणाऱ्या अर्जाच्या नमुन्यावर अर्ज करावा लागेल.

९. सर्व प्रवेश तात्पुरते असतील.

१०. ११ वी विज्ञानमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना एस.एस.सी.त विज्ञान विषयात ४० टक्के गुण आवश्यक आहेत.

**११. ११ वीच्या वार्षिक परीक्षेचा निकाल यावरच अवलंबून राहील.**

**१२. प्रवेशाच्या अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.**

१. एस.एस.सी. परीक्षेचे मूळ गुणपत्रक व चार सत्यप्रती

२. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र मूळ प्रत व चार सत्यप्रती

३. पासपोर्ट आकाराचे तीन फोटो

४. Duplicate T.C. वर प्रवेश मिळणार नाही.

५. इतर प्रांतातून येणाऱ्या विद्यार्थ्यांनी वरील कागदपत्रांबरोबर खालील कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.

अ. मायग्रेशन सर्टीफिकेट

ब. इलिजीबीटी फॉर्म

क. अभ्यासक्रमाची प्रत

ड. बोनाफाईड सर्टीफिकेट

१३. वर्ग ११ वी १२ वी साठी दोन चाचणी परीक्षा (Class Test) आणि ट्युटोरियल्स (Tutorials) व दोन सत्र परीक्षा (Terminal Examination) देणे आवश्यक आहे.

१४. कोणतीही चाचणी परीक्षा (Class Test) देणे ही अपरिहार्य कारणास्तव न देऊ शकल्यास विद्यार्थ्यांने अर्ज करावा.

१५. अशा विद्यार्थ्यांसाठी एक अतिरिक्त चाचणी परीक्षा (Remedial Test) घेतली जाईल.

१६. दोन चाचणी परीक्षा (Class Test) देणे प्रत्येक विद्यार्थ्यांना प्रत्येक सत्रात आवश्यक असतात. परीक्षेस गैरहजर राहिल्यास होणाऱ्या परिणामाला महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

१७. राष्ट्रीय सेवा योजने मध्ये सहभागी होणाऱ्या इयत्ता ११ व १२ वीच्या विद्यार्थ्यांना बोर्डाकडून १० अतिरिक्त गुण मंडळाच्या नियमानुसार मिळतील.

**उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम**

(HIGHER SECONDARY VOCATIONAL COURSE)

Sucject :

1) Marketing and Salesmanship
2) Purchasing and store keeping
3) Electronics Technology
4) Office management

- ह्या अभ्यासक्रमासाठी प्रत्येकी २० जागा ठरवून दिल्या आहेत.
- एस.एस.सी.च्या गुणाच्या व राखीव जागांच्या संख्येच्या आधारावर विद्यार्थ्यांची निवड केली जाईल. परंतु किमान ५० टक्के गुण आवश्यक आहेत.
- नियमानुसार निवडलेल्या विद्यार्थ्यांची नावे सूचना फलकावर लावण्यात येतात. ही निवड अंतिम असते.
- मुदतीच्या आत आलेल्या अर्जाचा विचार केला जाईल.
- या अभ्यासक्रमासाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांना सर्व नियमांचे पालन करावे लागेल. बाहेरून बोलावलेल्या पाहुणा शिक्षक (विषय तंज्ञाच्या) व्याख्यानमालांना उपस्थित राहाणे तसेच कारखाने, उदोगधंदे कंपन्याना भेटी देण्यासाठी स्वखर्चाने जावे लागेल.
- ह्या अभ्यासक्रमानंतर विद्यार्थ्यास बी.ए. व बी.कॉमला प्रवेश घेता येईल.
- हा दोन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना उमेदवारी प्रशिक्षण कायद्याखाली शिकावू उमेदवार म्हणून प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी संधी मिळू शकते व त्या कालावधीस विद्यार्थ्यांस रु.१४४०/ - प्रमाणे दरमहा विद्यावेतन मिळू शकेल.
- २ स्तरावरील किमान कौशल्यावर आधारित तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रम ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना राज्यातील शासकीय / अशासकीय तंत्रनिकेतनांमधील पदविका अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात प्रवेश मिळू शकेल.

## अभ्यासक्रम पदवी वर्ग
## Subjects (Senior College)

कला / सामाजिक विभाग शास्त्र शाखा

**(ARTS / SOCIAL SCIENCES बी.ए.प्रथम वर्ष)**

**अ. अनिवार्य विषय :**

१. इंग्रजी २. व्दितीय भाषा : हिंदी / मराठी / इंग्रजी (कोणताही एक)

**ब. ऐच्छिक विषय :**

खालील ग्रुप्सपैकी कोणताही एक ग्रूप निवडता येईल.

१. इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र
२. इतिहास, अर्थशास्त्र, मराठी
३. इतिहास, अर्थशास्त्र, हिंदी
४. इतिहास, अर्थशास्त्र, इंग्रजी
५. राज्यशास्त्र, लोकप्रशासन, मराठी
६. राज्यशास्त्र, लोकप्रशासन, हिंदी
७. राज्यशास्त्र, लोकप्रशासन, इंग्रजी
८. लोकप्रशासन, इतिहास, मराठी
९. लोकप्रशासन, इतिहास, हिंदी
१०. लोकप्रशासन, इतिहास, इंग्रजी
११. हिंदी, इतिहास, शा. शिक्षण
१२. मराठी, राज्यशास्त्र, शा.शिक्षण
१३. इतिहास, राज्यशास्त्र, लोकप्रशासन

**विज्ञान शाखा (SCIENCE FACULTY बी.एस्सी. प्रथम वर्ष)**

**अ. अनिवार्य विषय :**

१. इंग्रजी २. व्दितीय भाषा : हिंदी / मराठी / इंग्रजी (कोणताही एक)

**ब. ऐच्छिक विषय**

खालील ग्रूपपैकी कोणताही एक ग्रूप निवडता येईल.

१. वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र
२. वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र
३. रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, प्राणिशास्त्र
४. भौतिकशास्त्र, गणित, रसायनशास्त्र
५. भौतिकशास्त्र, गणित, इलेक्ट्रॉनिक्स
६. भौतिकशास्त्र, गणित, संगणकशास्त्र
७. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, संगणकशास्त्र
८. भौतिकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, संगणकशास्त्र
९. गणित, इलेक्ट्रॉनिक्स, संगणकशास्त्र
१०. गणित, रसायनशास्त्र, संगणकशास्त्र
११. वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र, संगणकशास्त्र
१२. प्राणिशास्त्र, रसायनशास्त्र, संगणकशास्त्र

**वाणिज्य शाखा (COMMERCE FACULTY)**

**बी.कॉम. प्रथम वर्ष** (B.Com. I Year)

अ. अनिवार्य विषय :- (1) English (2) द्वितीय भाषा : हिंदी /माराठी/इंग्रजी (कोणतीही एक)

I. SEM

1. Fundamentals of Financial Accounting - I

2. Fundamentals of Business Communication - I

3. Business Economics - I-II
4. Business Statistics - I-II
5. Computers for Business - I-II

II. SEM

1. Financial Accounting - II
2. Business Statistics and Mathematics - II
3. Business Economics - II
4. Modern Business Communication -II
5. Tally E.R.P. 9-II

**बी.कॉम. व्दितीय वर्ष** (B.Com. II Year)

**अ. अनिवार्य विषय :**

१. इंग्रजी २. व्दितीय भाषा : हिंदी / मराठी / इंग्रजी (कोणतीही एक)

**ब. ऐच्छिक विषय (Optional Subjects) :**

**SEMESTER III**

1. New Trends in Corporate Accounting
2. Corporate Law
3. Principles of Business Management and Practices
4. Cost Accounting-I
5. Banking and Finance
6. Income Tax I
7. E-Commerce/ E-Business Marketing Business Environment/ Business Ethics

**SEMESTER IV**

1. Advanced Corporate Accounting
2. Business Law
3. Risk Management
4. Advanced Planning of India
5. Advanced Cost Accounting
6. Income Tax -II
7. E-Governance/ Retail Business Ac/ E-Cyber Crime & Laws/E-Insurance

**बी.कॉम. तृतीय वर्ष (B.Com. III Year)**

**V & VI SEM**

1. Advance Accounting & Auditing - I-II
2. Managenal Accounting -I-II
3. Economic Development & Planning in India - I-II
4. Business Regulatory Framework - I - II
5. Environment Studies - I-II

**Group -B**

1. Human Resource Development -I - II
2. Marketing Management -I - II
3. Traning & Project Work - I - II

B.Com. I, II, III Year Diploma Course in Computersisation Accounting Fees Rs. 10,000/-

# पदवी प्रवेश नियमावली

१. बी.ए., बी.कॉम व बी.एस्सी या पदवी वर्गांसाठी प्रवेश गुणवत्तेच्या आधारे देण्यात येईल.

२. १२ वी परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यापासून १० दिवसांच्या आत नावनोंदणी करावी लागेल. नावनोंदणी केल्याशिवाय प्रवेश मिळणार नाही.

३. नावनोंदणीची मुदत संपल्यावर सात दिवसांच्या आत वर्गनिहाय गुणवत्ता यादी सूचना फलकावर प्रसिध्द केली जाईल. प्रथम यादी लागल्यापासून ७ दिवसांच्या आत विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला नाही, तर पुढील ५ दिवसांपर्यंत शिल्लक जागेप्रमाणे प्रवेश देण्यात येईल.

४. सर्व प्रवेश गुणवत्ता यादीप्रमाणे महाविद्यायात मान्यताप्राप्त व वर्गनिहाय तुकड्यांच्या एकूण प्रवेश क्षमतेप्रमाणे मर्यादित राहतील, तसेच ऐच्छिक विषयांच्या प्रत्येक विभागाची जागा मर्यादित असल्यामुळे संबंधित विभागातील प्रवेश त्या विभागाच्या गुणवत्ता यादीप्रमाणे दिला जाईल.

५. वर्गनिहाय एकूण प्रवेश क्षमतेच्या जागांपैकी राखीव संवर्गातील विद्यार्थ्यांसाठी खालील टक्केवारी प्रमाणे प्रवेश देण्यात येईल.

| | |
|---|---|
| १. अनुसूचित जाती | १३% |
| २. अनुसूचित जमाती | ७% |
| ३. विमुक्त जाती (१४ तत्सम जाती) | ३% |
| ४. भटक्या जमाती (२८ तत्सम जाती) | २.५% |
| ५. भटक्या जमाती (धनगर व तत्सम जाती) | ३.५% |
| ६. भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जाती) | २% |
| ७. इतर व विशेष मागासवर्गीय (ओ.बी.सी.) | १९% |
| ८. महिलांसाठी राखीव व खुले संवर्ग (प्रत्येकी) | ३०% |
| ९. अपंग व्यक्ती/स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य/माजी व आजी सैनिकांचे पाल्य व प्रकल्पग्रस्तांचे पाल्य (प्रवेशक्षमता व्यतिरिक्त) | २% |

६. प्रवेशक्षमता – बी.ए.प्र.व. ३३०, बी.कॉम. प्र.व. १२०, बी.एस्सी १२०

७. प्रवेशक्षमतेच्या १५ % जागा संस्थेतर्फे भरण्यात येतील.

८. ८५ % प्रवेश गुणवत्तेनुसार देण्यात येतील.

९. प्रवेश देताना (गुणवत्ता यादीत) स्थानिक विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाईल.

१०. कला शाखेतील ग्रूप व जागा खालीलप्रमाणे आहेतः

| | |
|---|---|
| १. इतिहास, अर्थशास्त्र, मराठी | २२ |
| २. इतिहास, अर्थशास्त्र, हिन्दी | २२ |
| ३. इतिहास, अर्थशास्त्र, इंग्रजी | ०९ |
| ४. इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र | २२ |

| | |
|---|---|
| ५. राज्यशास्त्र, लोकप्रशासन, मराठी | २० |
| ६. राज्यशास्त्र, लोकप्रशासन, इंग्रजी | १० |
| ७. राज्यशास्त्र, लोकप्रशासन, हिन्दी, | २२ |
| ८. मराठी, राज्यशास्त्र, शारीरिक शिक्षण | १५ |
| ९. इतिहास, राज्यशास्त्र, लोकप्रशासन | २१ |
| १०. लोकप्रशासन, इतिहास, मराठी | २१ |
| ११. लोकप्रशासन, इतिहास, हिन्दी | २१ |
| १२. लोकप्रशासन, इतिहास, इंग्रजी | ०५ |
| १३. हिन्दी, इतिहास, शारीरिक शिक्षण | १० |

११. विज्ञान शाखेतील ग्रूप व प्रत्येक ग्रूपसाठी जागा खालीलप्रमाणे आहेतः

| | |
|---|---|
| १. वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र | १० |
| २. वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र | १० |
| ३. रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, प्राणिशास्त्र | १० |
| ४. भौतिकशास्त्र, गणित, रसायनशास्त्र | १० |
| ५. भौतिकशास्त्र, गणित, इलेक्ट्रानिक्स | १० |
| ६. भौतिकशास्त्र, गणित, संगणकशास्त्र | १० |
| ७. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, संगणकशास्त्र | १० |
| ८. जीवशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, संगणकशास्त्र | १० |
| ९. गणित, इलेक्ट्रनिक्स, संगणकशास्त्र | १० |
| १०. गणित, रसायनशास्त्र, संगणकशास्त्र | १० |
| ११. वनस्पतिशास्त्र, रसायनशास्त्र,संगणकशास्त्र | १० |
| १२. प्राणिशास्त्र, रसायनशास्त्र, संगणकशास्त्र | १० |
| १३. रसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, प्राणिशास्त्र | १० |

१२. ग्रूपमध्ये जागा कमी जास्त करण्याचा अधिकार प्राचार्यांकडे राहील.

१३. प्रवेशासाठी वीस रुपये भरुन मिळणाऱ्या अर्जाच्या नमुन्यावर अर्ज करावा लागेल.

१४. विद्यापीठाकडून पात्रता क्र. मिळेपर्यंत प्रवेश तात्पुरत्या स्वरूपात असेल.

१५. प्रवेशासाठी अर्जासोबतच एच.एस.सी. परीक्षेचे मूळ प्रमाणपत्र त्या परीक्षेत मिळविलेल्या गुणांची यादी, महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र व पासपोर्ट आकाराचे तीन फोटो इत्यादी कागदपत्रे त्यांच्या चार प्रतींसह दाखल करावे लागतील. Duplicate T.C. वर प्रवेश मिळणार नाही.

१६. अन्य विद्यापीठांतून, अन्य बोर्डातून आलेल्या विद्यार्थ्यास त्या विद्यापीठाचे / बोर्डाचे बहिर्गमन (Migration Certificate) मूळ प्रमाणपत्र तीन सत्यप्रतीत दाखल करावे लागेल.

१७. विद्यार्थ्यांनी घेतलेले विषय किंवा ज्ञानशाखा कोणत्याही परिस्थितीत १५ जुलैनंतर बदलता येणार नाही. तसेच एखादा विषय किंवा शाखेत जागा शिल्लक असेल तर बदलण्याची परवानगी मिळेल. विद्यार्थ्यांनी विषय व शाखा निवडण्यापूर्वीच विचार करावा.

१८. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाकडून पात्रता प्रमाणपत्र (Eligibility Certificate) मिळविण्याची जबाबदारी विद्यार्थ्यावर आहे. त्यासाठी दिलेल्या मुदतीत छापील नमुन्यातील अर्ज व संबंधित प्रमाणपत्र कार्यालयात सादर करावे. विद्यापीठाकडून पात्रता प्रमाणपत्र न मिळाल्यास त्याची जबाबदारी महाविद्यालयावर राहणार नाही व प्रवेश रद्द होईल.

१९. पदवी वर्गासाठी प्रथम व व्दितीय सत्र परीक्षा देणे आवश्यक आहे.

२०. वाणिज्य विद्याशाखेमधील पदवी अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १०० गुणांचे प्रकल्प लेखन कार्य अनिवार्य असेल. संबंधित विद्यार्थ्यांना प्रथम वर्षाच्या प्रथम सत्राचा अभ्यासक्रम संपुष्टात येण्याअगोदर प्रकल्प लेखन कार्याचा विषय देणे आवश्यक आहे. त्यानंतर विद्यार्थ्यांनी प्रकल्प लेखन कार्यासंबंधीचा अहवाल अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेचा अर्ज भरण्यापूर्वी सादर करणे अनिवार्य राहील.

२१. विद्यापीठस्तरावर तीन वर्षांचा शैक्षणिक अभ्यासक्रम संगणक साक्षरतेच्या दृष्टिकोनातून तीन वर्षात किमान १०० तासांचे अभ्यासक्रम पूर्ण केल्याशिवाय विद्यार्थ्यांना पदवी परीक्षेच्या अंतिम परीक्षेला बसता येणार नाही.

## POST GARDUATE COURSES

**M.Com. First Year Semester - I**

1. Managerial Economics
2. Orgnisational Behavior
3. Statistical Analysis
4. International Business Environment

**Semester - II**

1. Accounting for Managerial Decisions
2. Corporate Tax Planning & Management
3. Operation Reserch
4. Strategic Management

**M.Com. Second Year Semester - III**

1. Service Management
2. Accounting & Finance
3. Operation Research
4. Strategic Management

**Semester - IV**

1. Recent Trends in Commerce & Management
2. Human Resource Managent - III
3. Research Methodology
4. Advanced Financial Accounting

**M.Sc. First Year (Physics) Semester - I**

1. Mathematical Physics
2. Classical Mechanics
3. Electronic Devices & Application
4. Atomic and Molecular Physics

**Semester - II**

1. Quantum Mechanics

2. Statistical Mechanics
3. Condensed Matter Physics
4. Numerical Techniques

**M.Sc. Second Year (Physics) Semester - III**

1. Electrodynamics
2. Nuclear and Particle Physics
3. Basics of Laser and Devices
4. Thin Film and Nano Physics

**Semester - IV**

1. Fiber Optics and Optical Fiber Communication
2. Microwaves and Measurements
3. Microprocessors and Microcontrollers
4. Lab Course based on Theory Papers

**M.Sc. First Year (Chemistry) Semester - I**

1. Inorganic Chemistry - I
2. Organic Chemistry -I
3. Physical Chemistry - I
4. Physical Methods in Chemistry - I

**Semester - II**

1. Inorganic Chemistry - II
2. Organic Chemistry - II
3. Physical Chemistry- II
4. Principles of Spetroscopy - II

**M.Sc. Second Year (Chemistry) Semester - III**

1. Advanced Spectroscopic Methods
2. Natural Products
3. Organic Synthesis - I
4. Medicinal Chemistry

**Semester - IV**

1. Advanced Hetrocyclic Chemistry
2. Big Organic & Green Chemistry
3. Organic Synthesis - II
4. Medicinal Chemistry

**पदव्युत्तर प्रवेशाबाबत नियम :**

१. एम.ए. प्रथम वर्षासाठी प्रवेश संबंधित विषय पदवीस्तरावर विषय म्हणून अभ्यासलेला असावा.

२. संबंधित विषयात खुल्या संवर्गासाठी किमान ४५ % गुण व राखीव संवर्गासाठी किमान ४० % गुण असणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत दशांशाचा फरक ग्राह्य धरला जाणार नाही. तसेच एकूण विषयांची सरासरी टक्केवारी किमान (एकूण) ४०% (खुल्या व राखीव व संवर्गासाठी) असणे आवश्यक आहे.

३. एम.कॉम. प्रथम वर्ष प्रवेशासाठी बी.कॉम. स्तरावर विशिष्ट ऐच्छिक विषय अभ्यासण्याची व्यवस्था नसल्यामुळे किमान ४० % गुण प्राप्त करणारे सर्व विद्यार्थी पात्र असतील.

४. एम.एस्सी. प्रवेशासाठी किमान ४५ % सरासरी गुण आवश्यक आहेत. तसेच संबंधित ऐच्छिक विषयात राखीवसाठी ४५ % व खुल्या संवर्गासाठी ५० % गुण आवश्यक आहेत.

५. पदव्युत्तर वर्गासाठी नावनोंदणी अर्ज महाविद्यालयात भरावा लागेल.

६. Admission to M.Sc. Physics/Chemistry will be finalised by University Committee.

## सर्वसाधारण नियम

१. सर्व प्रवेश हे गुणवत्तेच्या आधारेच देण्यात येतील.

२. उमेदवारांनी महाविद्यालयाने छापलेल्या माहिती पुस्तकेतील नियम वाचूनच प्रवेशअर्ज भरावा.

३. उमेदवारांनी विद्यापीठाच्या या प्रवेश प्रक्रियेचा व वेळापत्रकाचा काळजीपूर्वक अभ्यास करावा.

## प्रवेश क्षमतेची विभागणी :

१. एकूण प्रवेश क्षमतेच्या ७०% जागांवर या विद्यापीठाची प्रथम पदवी संपादन केलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.

२. एकूण प्रवेश क्षमतेच्या २८% जागांवर या विद्यापीठाचे पदवीधर वगळून महाराष्ट्र राज्यातील अन्य अकृषी विद्यापीठे, कृषी विद्यापीठ, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची प्रथम पदवी प्राप्त केलेले उमेदवार प्रवेशासाठी अर्ज करण्यास पात्र असतील.

३. एकूण प्रवेश क्षमतेपैकी उर्वरित २% जागांवर महाराष्ट्राबाहेरील मान्यताप्राप्त विद्यापीठांचे प्रथम पदवी प्राप्त उमेदवार प्रवेशासाठी अर्ज करण्यास पात्र असतील.

४. सैन्यदलातील आजी / माजी सैनिकांचा मुलगा/मुलगी/पती/पत्नीसाठी राखीव जागेवर प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी इतर राज्यातील मान्यता प्राप्त विद्यापीठाची प्रथम पदवी प्राप्त केली असेल तर ते देखील वरील २८% जागांमधील त्यांच्यासाठी राखीव असलेल्या जागावरच प्रवेशास पात्र ठरतील.

५. ३०% जागांसाठी विद्यापीठाबाहेरील उमेदवारांचे पुरेसे अर्ज प्राप्त न झाल्यास उर्वरित जागा या विद्यापीठ क्षेत्रातील यादीमधील उमेदवारांतून गुणानुक्रमे भरल्या जातील.

२ % जागांवरील प्रवेशासाठी राखीव असलेल्या जागा केवळ खुल्या समजून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

६. ७०% जागांसाठी विद्यापीठ क्षेत्रातील पुरेसे अर्ज जरी प्राप्त झाले नसले तर या जागांवर महाराष्ट्रातील इतर मान्यताप्राप्त विद्यापीठांकडून प्रथम पदवी प्राप्त उमेदवारांचे प्रवेश होतील. या व्यतिरिक्त उर्वरित जागा शिल्लक राहिल्यास विद्यापीठाच्या आदेशाप्रमाणे भरण्यात येतील.

## प्रवेश पात्रता

१. या पूर्वी विद्यापीठाने संबंधित पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी निर्धारित केलेली शैक्षणिक पात्रता संपादन करणे अनिवार्य आहे.

२. कला, वाणिज्य व विज्ञान या पदवी स्तरावर अनिवार्य अथवा व्दितीय भाषा उत्तीर्ण असलेले पदवीधर त्या त्या संबंधित भाषा विषयासाठीच्या एम.ए. पदव्युत्तर प्रथम वर्गाच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येतील.

३. संबंधित अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी या पूर्वी विद्यापीठाने निर्धारित केलेली टक्केवारी पदवी स्तरावर असणे अनिवार्य आहे. इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी तसेच पारंपरिक अव्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी या

पूर्वीची अट रद्द करण्यात आली आहे.

**राखीव जागांची तरतूद :**

१. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार एकूण प्रवेश क्षमतेच्या ५० % जागा मागासवर्गीय व इतर घटकासांठी खालीलप्रमाणे राखीव राहतील. सदर आरक्षण महाविद्यालयातील/संस्थेतील प्रवेश क्षमतेच्या मर्यादेपेक्षा जास्त होणार नाही.

| | |
|---|---|
| १. अनु. जाती व अनु.जमातीतील बौध्दधर्म स्वीकारलेली व्यक्ती | १३ % |
| २. अनुसूचित जमाती | ७ % |
| ३. विमुक्त जाती (१४ तत्सम जाती) | ३ % |
| ४. भटक्या जमाती (जानेवारी १९९० पूर्वीच्या २२ तत्सम जाती) एनटी-१ | २.५ % |
| ५. भटक्या जमाती (धनगर व तत्सम जाती) एन.टी.-२ | ३.५ % |
| ६. भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जाती) एन.टी. -३ | २.० % |
| ७. ओ.बी.सी. व विशेष मागास प्रवर्ग | १९ % |
| एकुण | ५० % |

२. भटक्या जमाती व तत्सम जाती धनगर व तत्सम भटक्या जमाती वंजारी व तत्सम आणि इतर मागासवर्गीय उमेदवारांबाबत शासन निर्णय क्रमांक सीबीसी-१०९४/प्र.क.८६/मावक-५, दि. १६/०६/१९९४ नुसार निश्चित करण्यात आलेल्या उन्नत व प्रगत व्यक्ती/गट यांना या प्रवर्गातील आरक्षित जागांसाठी पात्र समजले जाणार नाही.

३. राखीव जागांची तरतूद ७० % व ३० % जागांसाठी क्रमांकमधील तरतुदी प्रमाणे राहील. आरक्षित संवर्गातील प्रवेश त्या संवर्गातील विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार देण्यात येईल.

४. खुल्या संवर्गातील ५० % जागा व राखीव संवर्गातील ५०% जागा अंतर्गत स्वतंत्रपणे खालील संवर्गातील उमेदवारांना त्यासमोर दर्शविल्याप्रमाणे आरक्षण लागू राहील.
   अ. जिल्हा शल्य चिकित्सक यांनी प्रमाणपत्र दिलेले ३ % किमान ४० % अस्थिव्यंग उमेदवार
   ब. सैन्यदलातील सक्रिय सेवेत असलेले व माजी सैनिक २% यांच्या कर्मचाऱ्यांची मुलगे/अविवाहित मुली व पत्नी/पती

## ग्रंथालयाचे नियम

१. ग्रंथालयात शांतता राखली पाहिजे. शांतता भंग करण्याचा प्रयत्न केल्यास त्या विद्यार्थ्यावर कडक कार्यवाही केली जाईल.

२. ओळखपत्राशिवाय (Identity Card) ग्रंथालयातून पुस्तके मिळणार नाहीत.

३. मुदतीच्या आत पुस्तक परत करणे आवश्यक आहे. अन्यथा प्रत्येक दिवसासाठी रु. १/- या प्रमाणे दंड भरावा लागेल.

४. पुस्तक घेताना पुस्तकांची पृष्ठे कमी नसल्याची व ते सुस्थितीत असल्याची खात्री करून घ्यावे.

५. पुस्तकावर पेन्सीलने किंवा शाईने रेषा मारणे, खुणा करणे अथवा लिहिणे चुकीचे आहे. पुस्तक सुस्थितीत

ठेवण्याची जबाबदारी विद्यार्थ्याची आहे. पुस्तक फाटले किंवा त्यास कोणत्याही प्रकारची हानी पोहचली तर त्याची भरपाई करून द्यावी लागेल.

६. प्रत्येक वर्गासाठी नेमून दिलेल्या एका विशिष्ट दिवशी पुस्तकांची देव-घेव होईल.

७. ग्रंथालयाचे पुस्तक गहाळ झाल्यास किंवा हरवल्यास ग्रंथालयास त्वरित कळवावे. त्या ग्रंथाच्या किंमतीच्या दीडपट किंमत भरावी लागेल.

८. शब्दकोश आणि दुर्मिळ संदर्भ ग्रंथ ग्रंथालयाबाहेर नेण्याची परवानगी नाही.

९. होतकरू, अभ्यासू, गरीब विद्यार्थ्यांना या व्यतिरिक्त विषयासाठी पुस्तक पेढीतून व साह्य निधितून क्रमिक पुस्तके मिळतील.

१०. कथा, कादंबऱ्या, नाटक, धार्मिक ग्रंथ, चरित्र व सामान्य ज्ञानाची पुस्तके इ. संदर्भ ग्रंथांसाठी एक दिवस अगोदर पुस्तकाचे नाव, लेखक आणि स्वतःचे नाव, वर्ग, रोल नंबर लिहिलेला अर्ज ग्रंथालयात द्यावा लागेल.

११. अद्ययावत सोयींनी युक्त अशा अभ्यासिकेची व्यवस्था ग्रंथालयात आहे. तिथे सर्व क्रमिक पुस्तके व संदर्भ ग्रंथ विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध आहेत. वाचनकक्ष रात्री १० पर्यंत खुला असेल.

## सर्वसाधारण नियम

१. विद्यार्थ्यांनी कार्यालयात सादर केलेल्या प्रत्येक प्रमाणपत्रांच्या सत्यप्रतींची जबाबदारी सर्वस्वी विद्यार्थ्यावरच राहील. खोट्या प्रमाणपत्रा आधारे घेतलेला प्रवेश वर्षात केव्हाही पूर्वसूचना न देता रद्द करता येईल. अशा विद्यार्थ्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. त्यामुळे होणाऱ्या नुकसानीस विद्यार्थी स्वतः जबाबदार राहील.

२. बोर्ड, विद्यापीठ नियमानुसार आवश्यक ते शुल्क प्रवेश अर्जासोबत भरावे लागेल.

३. महाविद्यालयात प्रवेश देण्याचे व गंभीर कारणावरून प्रवेश नाकारण्याचे सर्व अधिकार प्राचार्यांकडे आहेत.

४. महाविद्यालयात दाखल केलेले मूळ प्रमाणपत्र, महाविद्यालय सोडताना परत मिळतील. तत्पूर्वी परत मिळणार नाहीत. या करिता विद्यार्थ्यांनी कागदपत्रे महाविद्यायात दाखल करण्यापूर्वी त्याच्या पुरेशा सत्यप्रती (Ture Copy) किंवा Xerox करून स्वतः जवळ ठेवावे. या संबंधी कार्यालयात विचारणा करू नये.

५. प्रवेश रद्द करणे व फी मिळण्याकरिता द्यिार्थ्यांनी आपला विनंती अर्ज १५ जुलै पूर्वी केल्यास तो मान्य होईल.

६. महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्याने थेअरी व प्रॅक्टीकल्सच्या वर्गात नियमित उपस्थित राहणे बंधनकारक राहील. उपस्थिती ७५ % पेक्षा कमी असल्यास वार्षिक परीक्षेस बसता येणार नाही.

७. वेळोवेळी घेतल्या जाणाऱ्या चाचणी परीक्षेत सर्व विद्यार्थी बसणे आवश्यक आहे.

८. प्रवेश, प्रमाणपत्रे, शिष्यवृत्ती, परीक्षा इत्यादी संबंधीच्या सूचना महाविद्यालयाच्या सूचना-फलकावर लावण्यात येतात. विद्यार्थ्यांनी दररोज महाविद्यालयात येताना व जाताना सूचनाफलक पाहण्याची सवय लावून घ्यावी.

९. महाविद्यालयाने दिलेले (Identity Card) ओळखपत्र विद्यार्थ्यांनी सोबत बाळगावे. त्या शिवाय त्यांना ग्रंथालयातून पुस्तक मिळणार नाही. ओळखपत्र महाविद्यालयात अनिवार्य आहे.

१०. ओळखपत्र हरवल्यास व्दितीय प्रत (Duplicate) साठी २५/- रु. दंड आकारण्यात येईल.

११. जे विद्यार्थी सतत १५ दिवस गैरहजर राहतील त्यांचे नाव हजेरी पटावरून कमी केली जातील.

१२. प्राचार्यांनी वेळोवेळी केलेले नियम विद्यार्थ्यांना बंधनकारक राहतील.

१३. पूर्ण फी देणाऱ्या विद्यार्थ्यांना तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे पैसे भरणे आवश्यक आहे.

१४. ई.बी.सी.ची सवलत उपभोगणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाकडून मिळणारी शुल्क वगळता बाकी पैसे भरावे लागतील.

१५. प्रत्येक वर्षी नवीन प्रवेश फी आकारण्यात येते.

१६. अत्यावश्यक मूळ प्रमाणपत्रे विशिष्ट मुदतीच्या आत कार्यालयात सादर न केल्यास त्याची जबाबदार सर्वस्वी विद्यार्थ्यांवर राहील व प्रवेश रद्द होईल.

१७. महाविद्यालयाने दिलेला प्रवेश हा तात्पुरत्या स्वरुपाचा असतो. एच.एस.सी. बोर्ड अथवा विद्यापीठाने मान्यता दिल्याशिवाय प्रवेश पूर्ण समजला जाणार नाही.

१८. कार्यालयात भरलेल्या शुल्काची व प्रमाणपत्राची पावती विद्यार्थ्यांने नेहमीसाठी जपून ठेवावी.

१९. एकदा दाखल केलेले शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.

२०. महाविद्यालयाचे Transfer Certificate मिळण्यासाठी विद्यार्थ्यांना अर्ज ३ दिवस अगोदर करावा लागेल.

२१. पहिल्या शैक्षणिक सत्राच्या मध्यावर महाविद्यालय सोडणाऱ्या विद्यार्थ्यांने एकूण वार्षिक शिक्षण शुल्कांची निम्मी रक्कम आणि प्रवेशाच्या वेळेत भरावे लागणारे सर्व शुल्क द्यावे लागेल. सर्व शुल्क भरल्याशिवाय त्या विद्यार्थ्यास परीक्षेत बसण्याची परवानगी देण्यात येणार नाही. तसेच महाविद्यालय सोडण्याचा दाखला (Transfer Cartificate) देण्यात येणार नाही.

२२. विहित मुदतीत शुल्क न भरल्यास त्या विद्यार्थ्याचे नाव महाविद्यालयाच्या हजेरी पटावरून कमी करण्यात येईल आणि शिल्लक दंडासहित पुन्हा रु.२०/- भरल्याशिवाय प्रवेश मिळणार नाही.

२३. ई.बी.सी./पी.टी.सी./जी.ओ.आई.मंजूर न झाल्यास विद्यार्थ्यांना स्वतः महाविद्यालयाची पूर्ण फी भरावी लागेल.

२४. महाविद्यालयाच्या अधिकारी वर्गाने केलेल्या नियमांचे पालन विद्यार्थ्यांने केले पाहिजे.

२५. विद्यार्थ्यांने आपले नाव एकाच पध्दतीने लिहिण्याची प्रथा अनुसरावी गुणपत्रिकेत आणि टी.सी. मध्ये नमुद केल्याप्रमाणे नाव प्रवेश अर्जात लिहावे. परीक्षेचा फार्म भरताना महाविद्यालयाच्या प्रवेश अर्जात नमुद केल्याप्रमाणे नाव लिहावे.

२६. एका विषयाच्या वर्गाऐवजी दुसऱ्या विषयाच्या वर्गात बसता येणार नाही.

२७. प्रत्येकास आपला कायमचा पूर्ण पत्ता व मोबाईल नंबर व ईमेल कार्यालयात द्यावे लागले.

२८. व्याख्याने (Lecturer), वर्गपाठ (Tutorials), प्रयोग (Practicals), आणि राष्ट्रीय छात्रसेनेची संचालने (N.C.C.Camps) व P.T. यास उपस्थित राहणे आवश्यक आहे व महत्त्वाचे आहे.

२९. महाविद्यालयातर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षा विद्यार्थ्यांनी दिल्या पाहिजेत. अनुपस्थित विद्यार्थ्यास प्रत्येक पेपरमागे दंड भरावा लागेल.

३०. विद्यार्थ्यांनी वर्गात वेळेवर हजर राहावे, उशिरा येऊ नये.

३१. महाविद्यालयाच्या आवारात थुंकू नये किंवा कचरा टाकू नये तसेच महाविद्यालयाच्या भिंतीवर लिहू नये, स्वच्छता, शांतता आणि शिस्त यांचे पालन करून महाविद्यालयाची व आपली प्रतिष्ठा राखावी.

३२. महाविद्यालयाच्या शिस्तीला व व्यवस्थेला बाधक होईल असे वर्तन विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयाच्या आवारात व आवाराबाहेर घडल्यास त्याला दंड करण्याचा किंवा त्याचा प्रवेश रद्द करण्याचा किंवा इतर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्याचा अधिकार प्राचार्यांना आहे प्राचार्यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

३३. महाविद्यालयाच्या व्हरांड्यातून गोंधळ करीत फिरणे, गर्दी करणे, तास चालू असताना खिडकीतून डोकावणे, मुलींना छेडणे इत्यादी कृत्ये बेशिस्तीची समजली जातात. व त्या बद्दल योग्य ती शिक्षा संबंधित विद्यार्थ्यांना केली जाईल.

३४. सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांशी सौजन्याने व नम्रतेने वागले पाहिजे. कोठेही उध्दटपणा व अरेरावी आढळून आल्यास संबंधित विद्यार्थ्याला प्राचार्य योग्य ती शिक्षा करतील.

३६. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील आपल्या प्रगतीसंबधी आपल्या पालकास वेळोवेळी माहिती दिली पाहिजे.

३७. Supreme Court of India order :

If any incident of ragging comes to the notice of the authority, the bonberned student shall be give liberty to explain and if his explanation is not found satisfactory, th◆a◆ thority would expel him from the instituion.

३८. आपले राष्ट्र, समाज, कुटुंब आणि स्वतःच्या अनुक्रमाने विद्यार्थ्यांनी आपल्या निष्ठा जोपासाव्या अणि याच अनुक्रमाने उन्नती करण्यासाठी आपले सर्व सामर्थ्य लावावे.

३९. प्रवेशासंदर्भात काही तक्रार असेल तर विद्यार्थ्यांनी लेखी अर्ज प्राचार्यांकडे द्यावा.

## ई.बी.सी. धारकांना प्रवेशासाठी लागणारी कागदपत्रे

१. रजिस्ट्रेशन फॉर्म (संबंधित वर्गाचा)

२. प्रवेश फॉर्म

३. टी.सी. (मूळ)

४. मार्क्स मेमो (मूळ)

५. इलिजीबिलिटी फॉर्म (इतर राज्यातील ११ वीच्या विद्यार्थ्यासाठी)

६. पासपोर्ट साईज फोटो ३ (तीन)

७. प्रोग्रेस रिपोर्ट (मागील वर्षी गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळालेल्यांसाठी)

८. टी.सी.च्या सत्यप्रती ४

९. मार्क्स मेमोच्या सत्यप्रती ४

१०. उत्पन्नाचे प्रमाणपत्र (एक प्रत)

अ. उत्पन्नाचा दाखला वर्ष १/४/२०२० ते ३१/०३/२०२१ पर्यंतचा

उत्पन्न रु. ८,५०,००० /- पेक्षा कमी असलेला पाहिजे.

ब. उत्पन्नाचा दाखला वडिलांच्या नावाने असावा. जर वडील हयात नसल्यास आईच्या नावाने आणावे

व वडील हयात नसल्याचे प्रमाणपत्र आणावे. आई-वडील दोघेही हयात नसल्यास दोघांचेही मृत्यू प्रमाणपत्र सरपंचाकडून आणावे व उत्पन्नाचा दाखला पालकांच्या नावाने आणावा.

११. गॅप सर्टीफिकेट (मागील वर्षी नापास झाले असल्यास)

१२. फॅमिली सर्टीफिकेट (१ प्रत) स्वतःला धरुन ३ पेक्षा जास्त भाऊ बहीण असल्यास फी माफी मिळणार नाही.

१३. ई.बी.सी. (१ प्रतीत) फ्रेश/रिनिवल प्रथम वर्षासाठी फ्रेशचा फॉर्म भरावा. प्रथम वर्षासाठी इतर शाळेतून येणाऱ्या विद्यार्थ्यानीही फ्रेशचा फॉर्म भरावा. इतर सर्व विद्यार्थ्यांना रिनिवलचा फार्म भरावा व मागील मंजुरी क्रमांक त्यावर लिहावा.

१४. ई.बी.सी. मंजूर क्रमांक प्रमाणपत्र

१५. ई.बी.सी.च्या विद्यार्थ्यांनी https://mahadbtmahait.gov.in या संकेत स्थळावर फार्म भरून घ्यावेत.

**मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी लागणारी कागदपत्रे :**

१. रजिस्टेशन फॉर्म (संबधित वर्गाचा)

२. प्रवेश फॉर्म

३. ओरीजिनल टी.सी.

४. ओरिजिनल मार्क्स मेमो

५. पासपोर्ट साईज फोटो ३ (तीन)

६. टी.सी.च्या सत्यप्रती ४

७. मार्क्स मेमोच्या सत्यप्रती ४

८. इलिजीबिलिटी फार्म (बी.ए., बी.कॉम., व बी.एस्सी प्रथम वर्षासाठी)

९. शिष्यवृत्ती फॉर्म (नवीन/नवीनीकरण) फ्री-शिपचा फॉर्म इंटरनेटवर ऑनलाईन पध्दतीने सुचनेत दिलेल्या वेळेतच आपला फॉर्म भरून एक हार्ड कॉपी ऑफीसमध्ये दाखल केल्यानंतरच शिष्यवृत्तीचा लाभ मिळेल. शिष्यवृत्तीचा फॉर्म भरण्यासाठी बँक खाते क्रमांक आवश्यक आहे.

**SC, ST, NT, OBC, SBC च्या विद्यार्थ्यांनी**

**https://mahadbtmahait.gov.in या संकेत स्थळावर फॉम पूर्ण भरून घ्यावेत**

अ) ११ वी, B.A., B.Com, B.Sc प्रथम वर्ष तसेच जे विद्यार्थी नापास होऊन गॅप झालेले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांनी नवीन फॉर्म भरावे.

ब) इतर सर्व वर्गाच्या विद्यार्थ्यांनी नूतनीकरणाचा फॉर्म भरावा.

१०. जातीचे प्रमाणपत्र (मूळ प्रत व २ सत्यप्रती)

उपजिल्हाधिकाऱ्यांकडून जातीचे प्रमाणपत्र आणणे आवश्यक.

११. उत्पन्नाचा दाखला (मूळ प्रत व २ सत्यप्रती)

शिष्यवृत्ती फॉर्म भरललेल्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्पन्नाचा दाखला तहसीलदारांकडून सन २०२०-२०२१ चा आणणे आवश्यक आहे.

१२. गॅप अफेडेव्हीट (मूळ प्रत व २ सत्यप्रती)

जे विद्यार्थी नापास होऊन गॅप झालेले आहेत. अशांनी रु.१०० च्या बाँडवर शपथपत्र देणे आवश्यक आहे. (नोटरी आवश्यक)

१३. अंडरटेकींग फॉर्म (१ प्रत), आधार कार्ड (१ प्रत), अनिवार्य

१४. वसतिगृहाचे प्रमाणपत्र : (१) ज्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या वसतिगृहात प्रवेश घेतला आहे.

अशांना वसतिगृह प्रमुखांकडून प्रमाणपत्र घ्यावे लागेल.

१५. जी.ओ.आय.मंजुरी आदेश क्र. प्रमाणपत्र व एकूण रक्कम मंजूर झालेली.

१६. फ्री-शिप विद्यार्थ्यासाठी उत्पन्नाचे प्रमाणपत्र व जातीचे प्रमाणपत्र आवश्यक.

१७. आधार क्रमांक (आधार कार्ड) बँकेच्या व्यवहारासाठी अनिवार्य आहे. आपला आधार क्रमांक अद्ययावत करून घ्यावा. अन्यथा आपणास शासनाच्या योजनेचा लाभ मिळणार नाही.

सूचना : १) ज्या विद्यार्थ्याच्या शाळेच्या टी.सी.मध्ये जातीचा उल्लेख नसेल किंवा टी.सी. मध्ये लिहिलेली जात उपजिल्हाधिकाऱ्यांच्या जात प्रमाणत्रप्रमाणे नसेल तर अशा विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती फॉर्म भरू नये.

२) महाविद्यालयातील वसतिगृहात प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना/विद्यार्थ्यीनींना (H.S.) प्रमाणे शिष्यवृत्ती मिळेल बाकी सर्व विद्यार्थ्यांना (D.S.) प्रमाणे शिष्यवृत्ती मिळेल.

## केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठीची मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना सन २०२१-२०२२

मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, जैन व पारशी या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिक्षणासाठी केंद्र शासन पुरस्कृत मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना राज्यामध्ये सन २००७-२००८ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा व त्यासाठी आवश्यक असलेला अर्ज सोईस्करपणे उपलब्ध व्हावा व तो विद्यार्थ्यांना केव्हाही सहजपणे भरता यावा यासाठी विद्यार्थ्यांचे नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नूतनीकरण (Renewal) करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

शिष्यवृत्तीसाठी पात्र अभ्यासक्रम :- ११ वी ते पीएच.डी/व्यावसायिक/डी.एड्./बी.एड्./एम.एड्./ इत्यादी तसेच सर्व आय.टी.आय. (एन.सी.व्ही.टी) सर्व डिप्लोमा व अकरावी /बारावी स्तरावरील एम.सी.व्ही.सी. अभ्यासक्रम (तंत्र शिक्षण विभागातील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यादीतील अभ्यासक्रम सोडून इतर सर्व)

किमान पात्रता व अटी :- १) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

२) मागील वार्षिक परीक्षेत किमान ५० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.

३) अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा/स्टायफंड योजनेचा लाभार्थी नसावा.

४) नूतनीकरणासाठी विद्यार्थ्यांने पुढील वर्गात प्रवेश घेतलेला असावा.

५) अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.२.०० लाख इतकी आहे.

६) एका कुटुंबातील फक्त दोन अपत्यांनाच सदर योजनेचा लाभ घेता येईल.

७) या योजनेसाठी ३० टक्के संच मुलीसाठी राखीव आहेत.

८) एखाद्या विद्यार्थ्यांने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटीचे उल्लंघन करून शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल/वसूल केली जाईल.

९) विद्यार्थ्यांने नजीकच्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत किंवा इतर कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये स्वतःचे खाते उघडणे आवश्यक आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाने विद्यार्थ्यांना शून्य रक्कमेवर बँक खाते उघडण्यासाठी खास सवलत दिलेली आहे.

१०) आवश्यक ती कागदपत्रे सोबत जोडली नसल्यास तसेच विद्यार्थ्यांने आपले अर्ज प्राचार्यांच्या मार्फत न पाठविल्यास तो अर्ज अपात्र ठरविला जाईल.

अर्जासोबत खालील आवश्यक कागदपत्रे जोडावीत :- १) अर्जावर विद्यार्थ्यांचे पासपोर्ट साईजचे छायाचित्र (फोटो २) २) माध्यमिक शालान्त परीक्षा (दहावी) पासून उत्तीर्ण सर्व परीक्षेंची गुणपत्रिकांची साक्षांकित प्रत ३) कायम निवासाच्या पत्त्यासंबंधी पुरावा म्हणून शिधापत्रिकेची प्रत,वीज/दूरध्वनी देयकाची प्रत, पारपत्राची प्रत, निवडणूक ओळखपत्राची प्रत, या पैकी कोणताही एक पुरावा सादर करावा. वार्षिक उत्पन्न स्वयंघोषित घोषणापत्र रेव्हेन्यू स्टँम्प लावून अर्जासोबच्या छापील नमुन्यात देणे आवश्यक आहे. ५) बँक पासबुकच्या पहिल्या पानाची सत्यप्रत, ज्यावर खातेदाराचे नाव, पत्ता, खाते क्रमांक नोंद आहे, त्याची छायांकित प्रत.

## अर्ज करण्याची पध्दत

१. सन २०१३-१४ पासून शिष्यवृत्तीचे ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

२. पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी या https://scholarships.gov.in संकेत स्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे.

३. ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांने वरील संकेतस्थळावरून स्वतःची आवश्यक ती माहिती भरून स्वतःचा युजर आय.डी. व पासवर्ड तयार करून घ्यावा. सदरचा युजर आय.डी. व पासवर्ड विद्यार्थ्यास त्याचा अर्ज करण्यासाठी, अर्जामध्ये सुधारण करण्यासाठी व अर्जाची सद्यःस्थिती जाणून घेण्याच्या कामी उपयोगी येणार आहे. त्यासाठी सदर युजर आय.डी. व पासवर्ड विद्यार्थ्याने कायमस्वरुपी जतन करून ठेवणे आवश्यक आहे.

४. विद्यार्थ्यांने त्याचा युजर आय.डी. व पासवर्ड वापरून वरील संकेतस्थळावरून त्याचा ऑनलाईन अर्ज सादर करावा. तथापि ऑनलाईन अर्ज सादर करण्यापूर्वी योजनेची मार्गदर्शक तत्त्वे वाचून व समजून घ्यावीत. त्याचप्रमाणे ऑनलाईन अर्जाची एक नमुना प्रिंट घेऊन, त्यात आपली माहिती भरून घेऊन ती अचूक असल्याची खात्री झाल्यानंतरच त्याचा ऑनलाईन अर्ज करावा. जेणेकरून वेळेची बचत होऊन, अचूक ऑनलाईन अर्ज भरला जाईल.

५. अर्ज भरून होताच विद्यार्थ्यांनी त्याची प्रिंट घ्यावी व त्याला आवश्यक ती कागदपत्रे जोडून आपल्या महविद्यालयात पुढील कार्यवाहीसाठी सादर करावा.

६. ऑनलाईन अर्ज करताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय/संस्थेशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालयाच्या/संस्थेच्या मदतीने पूर्ण करून घ्यावा. प्राचार्यांनी तो अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये आणावा. सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये येणे अनिवार्य आहे.

७. ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर होईल अशा विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम त्यांनी स्वतःचे खाते उघडलेल्या राष्ट्रीयीकृत बँकेच्या खात्यावर जमा करण्यात येईल.

## नूतनीकरण

शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणासाठी देखील महाविद्यालय/संस्थेकडे ऑनलाईन पध्दतीने शासनाच्या सन २०२१-२०२२ च्या वेळापत्रकानुसार प्राचार्यांमार्फत अर्ज करणे आवश्यक आहे. नूतनीकरणासाठी फक्त मागील वर्षाची

गुणपत्रिका आणि जोडपत्र-१ नुसार वार्षिक उत्पन्नाचा दाखला अर्जासोबत जोडण्यात यावा. अधिक माहितीसाठी https://scholarships.gov.in हे संकेतस्थळ अवलोकन करावे किंवा विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक किंवा उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांच्याकडे फोन ०२०-२६१२६९३९ वर संपर्क साधावा.

## पूर्ण फी भरणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी खालील कागदपत्रांची आवश्यकता आहे.

१. रजिस्ट्रेशन फॉर्म (संबंधित वर्गाचा) २. प्रवेश फॉर्म
३. ओरिजिनल टी.सी. ४. ओरिजिनल मार्क्स मेमो
५. इलिजीबिलिटी फॉर्म (बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी प्रथम वर्षासाठी)
६. पासपोर्ट साईज फोटो ३ (तीन)
७. प्रोग्रेस रिपोर्ट (मागील वर्षी गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळालेल्यांसाठी)
८. टी.सी.च्या सत्यप्रती ४ ९. मार्क्स मेमोच्या सत्यप्रती ४

## प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना फी माफीची सवलत

१. वरील सवलतीसाठी विद्यार्थ्यांनी संबंधित अर्जाचा फॉर्म भरणे आवश्यक आहे.

२. वडील/आई पूर्ण वेळ प्राथमिक/माध्यमिक उच्चमाध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी असणे आवश्यक आहे.

३. त्यासाठी मा. शिक्षणधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) यांची स्वाक्षरी आवश्यक आहे.

४. अपत्य व गुणवत्ता प्रमाणपत्रावर गटविकास अधिकाऱ्यांची सही आवश्यक आहे.

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
## परिशिष्ट - अ

अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमांत सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पदवी अंतिम परीक्षेत पाच अतिरिक्त गुण देण्याबद्दल नियमावली......

१. पाच (५) अतिरिक्त गुण पदवी परीक्षेच्या गुण संख्येत समाविष्ट केले जातील.

२. पदवी अंतिम परीक्षेच्या एक अथवा दोन विषयात पाच अथवा पेक्षा कमी गुणांच्या अभावी अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त पाच गुण समाविष्ट केल्यानंतर जर उत्तीर्ण होत असतील तर त्याचा ही लाभ घेता येईल, अन्यथा वर दर्शविल्याप्रमाणे (१) एकत्रित गुणसंख्येत समाविष्ट केले जातील.

३. जर एखादा विद्यार्थी एकापेक्षा अधिक उपक्रमांत सहभागी झालेला असला तरी वाढीव गुण पाच पेक्षा अधिक मिळू शकत नाहीत.

४. अतिरिक्त गुणांच्या सवलतीचा वापर गुणवत्ता यादीसाठी करता येणार नाही.

५. अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमांमध्ये सहभागासाठी खालील अटींची पूर्तता केली असेल तरच अतिरिक्त गुण देण्यांत येतील.

## STATEMENT OF FEES

| | XI Arts/Com. | | XI Sci. | | XI M.C.V.C. | | XI M.C.V.C | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | FP | EBC/ GOI/ STC/ PTC | FP | EBC/ GOI/ STC/ PTC | FP | EBC/ GOI/ STC/ PTC | FP | EBC/ GOI/ STC/ PTC |
| 1.Admn. Fees | 16 | - | 16 | - | 20 | - | - | - |
| 2.Term Fees | 32 | - | 32 | - | 40 | - | 50 | - |
| 3.Tution Fees | 192 | - | 192 | - | 240 | - | 300 | - |
| 4.Lab. Fees | - | - | 70 | - | 80 | - | 100 | - |
| 5.Lib. Dep. | 20 | 20 | 20 | 20 | - | - | - | - |
| 6.Lab. Dep. | - | - | 40 | 40 | 100 | - | - | - |
| 7.Coll.Exam. | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 8.Soc. & Cul. | 25 | 25 | 25 | 25 | - | - | - | - |
| **TOTAL** | **305** | **65** | **415** | **105** | **500** | **20** | **470** | **20** |

Note : 1. Board Eligibility Fees out of Marathwada 100/-

2. Board Examination Fees - Extra

३.शिक्षण शुल्कामध्ये सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे. शिक्षण शुल्क सुधारित झाल्यास उर्वरित शुल्क त्या अनुसार भरावे लागेल.

## STATEMENT OF FEES

| IIX Arts/Com. | | | XII Sci. | | | Other College XII Arts/Com. | | Other College XII Sci. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| EBC/ GOI/ STC/ PTC | FP | FP/R | EBC/ GOI/ STC/ PTC | FP | EBC/ GOI/ STC/ FP/R | PTC | EBC/ GOI/ STC/ FP | PTC | FP |
| - | - | 18 | - | - | 18 | 18 | 18 | 18 | 18 |
| - | 36 | 36 | - | 36 | 36 | - | 36 | - | 36 |
| - | 216 | 216 | - | 216 | 216 | - | 216 | - | 216 |
| - | - | - | 70 | 70 | - | - | | - | 70 |
| - | - | - | - | - | - | 20 | 20 | 20 | 20 |
| - | - | - | - | - | - | - | - | 40 | 40 |
| 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 20 |
| **45** | **297** | **315** | **45** | **367** | **385** | **83** | **335** | **123** | **445** |

टिपः ११वी, १२वीत संस्कृत विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यास रू१०००/– व संगीत विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यास रू. १५००/–, संगणकशास्त्र व पीकशास्त्र विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यास रू. ५०००/– अतिरिक्त शुल्क लागेल.

## STATEMENT OF FEES

| Sr. | Items of Fees | B.A/B.Com. | B.Sc. |
|---|---|---|---|
| 1 | Registration Fees | 10 | 10 |
| 2 | Admission Fees | 40 | 40 |
| 3 | Tution Fees | 1000 | 1000 |
| 4 | Eligibility Fees | 110 | 110 |
| 5 | Library Deposit | 100 | 100 |
| 6 | Laboratory Fees | (B.A.)150 | 300 |
| 7 | Magazine Fees | 40 | 40 |
| 8 | S.A.F. Fees | 10 | 10 |
| 9 | Games Fees (Gymkhana) | 50 | 50 |
| 10 | Gathering Fees | 60 | 60 |
| 11 | Library Fees | 150 | 150 |
| 12 | Students Welfare Fees | 40 | 40 |
| 13 | College Devolpment Fees | 50 | 50 |
| 14 | Identity Card Fees | 10 | 10 |
| 15 | Students Forum Fees (Council) | 15 | 15 |
| 16 | Home Exam. Fees | 30 | 30 |
| 17 | Medical Examination Fees | 05 | 05 |
| 18 | University Sports Fees | 50 | 50 |
| 19 | Miscellaneous Fees(Other Fees) | 20 | 20 |
| 20 | T.C. Fees | 50 | 50 |
| 21 | Book Bank | 10 | 10 |
| 22 | Youth Festival | 50 | 50 |
| 23 | Ashwamedh | 30 | 30 |
| 24 | Emergency Fees | 15 | 15 |
| 25 | Students Insurance Fees | 8 | 8 |
| 26 | Chancellor's office Activites Fees | 32 | 32 |
| 27 | Zonal Sports Council Fees | 50 | 50 |
| | **Total** | **2185** | **2335** |

**Note :**

1. University Eligibility Fees out of Marathwad 200/-
2. University Eligibility Fees out of Maharashtra 500/-
3. Computer Lab. Fees for B.Com 50/-
4. Project Report Fee for B.Com 15/-
5. Environmental Study Fees 150/-

टीप : ६. शिक्षक शुल्कामध्ये सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे. शिक्षक शुल्क सुधारित झाल्यास उर्वरित शुल्क त्या अनुसार भरावे लागेल.

७. संगणकशास्त्र शारीरिक शिक्षण हे ऐच्छिक विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना खालील प्रमाणे अतिरिक्त फीस लागेल.

बी. एस्सी. संगणकशास्त्र १५०० /- दरवर्षी

बी. ए. शारिरीक शिक्षण ३०० /- दरवर्षी

8. Career Oriented Course Fees
9. Bio-Technology Fees (B.Sc.)

10. Computers Literacy Fees (I/II/III Year)

**अ. राष्ट्रीय छात्र सेना :–**

१. सलग दोन वर्ष ह्या उपक्रमांत विद्यार्थी सहभागी असला पाहिजे.

२. दोन्ही वर्षातील त्याची उपस्थिती ७५% असावी.

३. विद्यार्थी ब अथवा सी प्रमाणपत्र उत्तीर्ण असावा. अथवा
वरील दोन वर्षात किमान एक वेळेस सदर विद्यार्थ्यांने रक्तदान केलेले असावे.

**ब. क्रीडा स्पर्धा :–**

१. आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत वैयक्तिक अथवा आंतर महाविद्यालयीन सांघिक सामन्यात पहिला अथवा दुसरा पुरस्कार मिळविलेला असावा. अथवा आंतर विद्यापीठीय पातळीवर विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले असावे.

२. सदर पुरस्कार पदवी शिक्षणांच्या कालखंडात मिळविलेला असावा.

**क. सांस्कृतिक स्पर्धा :–**

१. आंतर महाविद्यालयीन युवक

२. सदर पुरस्कार पदवी शिक्षणांच्या कालखंडात मिळविलेला असावा. अथवा
आंतर विद्यापीठीय युवक महोत्सवात विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केलेले असावे.

**ड. राष्ट्रीय सेवा योजना :–**

१. २४० तासांच्या उपस्थितीसह सतत दोन वर्ष ह्या उपक्रमांत सहभाग असावा.

२. किमान एका शिबीरात सहभागी झाल्याचे प्रमाणपत्र मिळविलेले असावे.

३. दोन वर्षात किमान एक वेळेस तरी रक्तदान केलेले असावे. अथवा
राज्य पातळीवरील राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात सहभाग असावा.

**STATEMENT OF FEES**

| **Sr.** | **Items of Fees** | **M.Com /M.A.** | **M.Sc. Phy.** | **M.Sc. Chem.** |
|---|---|---|---|---|
| 1 | Gymkhana Fees/Games Fees | 50 | 50 | 50 |
| 2 | Admission Fees | 25 | 25 | 25 |
| 3 | Tution Fees | 4000 | 20500 | 22000 |
| 4 | Eligibility Fees | 110 | 110 | 110 |
| 5 | Social Gathering Fees | 40 | 40 | 40 |
| 6 | Laboratory Fees | - | 2000 | 2000 |
| 7 | Student Deposit/Lib. & Labn. Deposit | - | 100 | 100 |
| 8 | Library Fees | 200 | 200 | 200 |
| 9 | Library Deposit | 500 | - | - |
| 10 | Other Charges | 10 | 15 | 15 |
| 11 | Indentity Card Fees | 5 | 5 | 10 |
| 12 | Students Council | 15 | 15 | 15 |
| 13 | College Exam. Fees | 20 | 100 | 100 |
| 14 | Magazine Fees | 25 | 25 | 25 |
| 15 | University Games Fees | 50 | 50 | 50 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 16 | Students Welfare Activities Fees | 40 | 30 | 40 |
| 17 | College Development Fees | 20 | 1000 | 1000 |
| 18 | Registration Fees | 100 | 100 | 100 |
| 19 | Students Safety Insurance Fees | 8 | 10 | 10 |
| 20 | Project Report (IInd Year) | 15 | - | - |
| 21 | Uni. Sports Cultural Activities | 10 | 10 | 10 |
| 22 | Uni. Emergency Fees | 10 | 10 | 10 |
| 23 | Uni. Earn & Learn Fees | 10 | 10 | 10 |
| 24 | Uni. Ashwamegh Fees | 30 | 10 | 30 |
| 25 | Enviromental Study Fees (IInd Year) | 50 | - | - |
| 26 | E-com. Fees (M.Com II) | 50 | - | - |
| 27 | E-Suvidha Fees/E-mail | 50 | 50 | 50 |
| | **Total - I** | **5328** | **23880** | **26000** |
| | **Total - II** | **4733** | **23880** | **23890** |

Note : 1. University Eligibility Fees out of Marathwada 200 /-

2. University Eligibility Fees out of Maharashtra 500 /-

3. T.C. Fees 10 /-

४. शैक्षणिक शुल्क सुधारित करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे.

शिक्षण शुल्क सुधारित झाल्यास उर्वरित शुल्क त्या नुसार भरावे लागेल.

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## – विद्यार्थी आचार व अनुशासन संहिता –

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विविध विभागात आणि त्याच्यांशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांत प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींना महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम ९५ अंतर्गत तयार करण्यात आलेली विद्यार्थी आचारसंहिता लागू असेल.

१. वैद्यकीय कारणाव्यतिरिक्त पूर्व परवानगीशिवाय सतत एक आठवडा गैरहजर राहिल्यास प्रवेश रद्द केला जाईल.

२. प्रवेश पूर्ण होताच आपले ओळखपत्र प्राप्त करून ते आपल्याजवळ नेहमी बाळगावे सर्व विषयांच्या तासांना नियमितपणे उपस्थित राहावे.

३. भाषा विषयातील सर्व पाठयपुस्तके, वह्या, प्रात्यक्षिक आणि इतर आवश्यक शैक्षणिक साहित्य वर्गात व प्रयोगशाळेमध्ये सोबत बाळगणे आवश्यक आहे.

४. अनिवार्य व ऐच्छिक अशा सर्व विषयांत तसेच प्रात्यक्षिकात ७५ % उपस्थिती अनिवार्य आहे. ही अट पूर्ण न करणाऱ्या विद्यार्थ्यास विद्यापीठ परीक्षेस बसण्यासाठी अपात्र मानले जाईल व परवानगी नाकारली जाईल.

५. वर्गात जागरुक राहून वर्गातील शिस्तीचे पालन करावे.

६. संबंधित प्राध्यापकांच्या पूर्व परवानगीशिवाय वर्गात/प्रयोगशाळेत प्रवेश करू नये/अथवा वर्ग/प्रयोगशाळा सोडून बाहेर जाऊ नये.

७. दिलेल्या शिक्षणविषयक लेखनकार्य (ट्युटोरीयल) गृहपाठ, प्रात्यक्षिके आणि चर्चासत्रे निष्ठापूर्वक करावीत.

८. संबंधित वर्गासाठी/विषयासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या वर्ग चाचण्या व सत्र परीक्षांना बसावे.

९. संबंधित अधिकाऱ्यांच्या पूर्वसम्मतीशिवाय वसतिगृह, महाविद्यालय आणि विद्यापीठ परिसरांत कोणत्याही व्यक्तीला निमंत्रित करू नये अथवा बरोबर आणू नये.

१०. विदेशी/आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या धार्मिक, राष्ट्रीय व सांस्कृतिक परंपरांचा व वारशाचा सन्मान करावा आणि त्यांना मित्रत्वाची वागणूक द्यावी.

११. महाविद्यालय आणि विद्यापीठाच्या ग्रंथालयातील उपलब्ध असलेल्या सोयींचा योग्य रीतीने उपयोग करावी.

१२. ग्रंथालय व अभ्यास दालनात शांतता पाळावी.

१३. वृत्तपत्रे, नियमकालिके व संशोधन पत्रिका यांचे नियमितपणे वाचन करावे आणि आपल्या ज्ञानात भर घालावी.

१४. पाठ्यपुस्तकाशिवाय संदर्भ ग्रंथ वाचण्याची आवड विकसित करावी.

१५. ग्रंथालयातील पुस्तके, मासिके आणि नियतकालिके काळजीपूर्वक हाताळावीत. त्यांचे नुकसान केल्यास दंड आकारला जाईल.

१६. महाविद्यालय आणि विद्यापीठाचा परिसर, परिसरातील इमारती, क्रीडांगणे, उद्याने इ.स्वच्छ व सुंदर ठेवण्याच्या कामी संबंधित अधिकाऱ्यांना पूर्ण सहकार्य करावे.

१७. खाजगी शिकवण्यावर आळा घालण्याच्या दृष्टीने संबंधित प्रशासनाला अर्थात अधिकारी व प्राचार्यांना आवश्यक तेथे जादा वर्ग/तास घेण्यासंबंधी विनंती करावी.

१८. महाविद्यालयात / विद्यापीठात वेळोवेळी आयोजित केल्या जाणाऱ्या अभ्यासांशी निगडित अभ्यासपूरक अशा उपक्रमांना तसेच विस्तार आणि समाजसेवा विषयक कार्यक्रमांना उपस्थित रहावे.

**अ. खेळाडू विद्यार्थी :**

खेळाडूंनी नियमितपणे सरावासाठी मैदान / क्रीडांगणावर उपस्थित रहावे. अनियमित राहणाऱ्या व पुरेसे नैपुण्य प्राप्त न करणाऱ्या खेळांडूचा विविध/आंतर महाविद्यालयीन/आंतर विद्यापीठीय क्रीडा स्पर्धेत प्रतिनिधित्व करण्याचा विचार केला जाणार नाही.

**ब. राष्ट्रीय सेवा योजना** (N.S.S.) :

राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी महाविद्यालय / विद्यापीठीय अधिकाऱ्यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमांना, शिबिरे व विशेष शिबिरांना उपस्थित राहावे व कर्तव्य भावनेने त्यात सहभागी व्हावे. राष्ट्रीय सेवा योजनेतंर्गत जे प्रकल्प हाती घेण्यांत येतील, त्यात जाणीवपूर्वक सहभागी होऊन योगदान द्यावे.

**क. राष्ट्रीय छात्र सेना योजना** (N.C.C.) ...

राष्ट्रीय छात्र सेनेच्या अपेक्षेप्रमाणे प्रत्येक कॅडेटने परेडला उपस्थित राहावे आणि संबंधित अधिकाऱ्यांनी आयोजित केलेली वार्षिक प्रशिक्षण शिबिरे, नेतृत्व शिबिरे, सायकल सहली, गिर्यारोहन, रक्तदान इत्यादींना उपस्थित राहावे.

**ड. कला व सांस्कृतिक उपक्रम**

सांस्कृतिक कार्यक्रमांत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी संगीत, नाटक व इतर सांस्कृतिक उपक्रमांच्या सरावासाठी नियमितपणे उपस्थित रहावे. जे विद्यार्थी सरावासाठी नियमित उपस्थित राहणार नाहीत

त्यांची महाविद्यालय/विद्यापीठ युवक महोत्सव व अन्य स्पर्धांसाठी प्रतिनिधी म्हणून निवड केली जाणार नाही.

२०. आपल्यामध्ये वैज्ञानिक व धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन, श्रमप्रतिष्ठा व नैतिक मूल्ये आत्मसात करण्याचा, तसेच लोकशाही जीवनव्यवस्था आणि राष्ट्रीय एकात्मता संबंधीच्या आदर्श तत्त्वांचा विकास आपल्या आचार-विचारातून जाणीवपूर्वक करावा.

२१. आपला सांस्कृतिक वारसा जतन करण्याचा आणि राष्ट्रीय विकासाच्या उद्दिष्टांशी त्यातील उदात्त मूल्यांशी जोडण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करावा.

**२. विद्यार्थी आणि त्यांचे वर्तन :**

१. आपले महाविद्यालय व विद्यापीठ यांच्या लौकिकात भर पडेल असेच वर्तन करावे आणि त्यास पोषक ठरतील अशात उपक्रमात सहभागी व्हावे.

२. वसतिगृह, महाविद्यालय आणि विद्यापीठ परिसरात आपल्या विनयशील वर्तणुकीने पोषक सौहार्दपूर्ण असे वातावरण निर्माण करावे.

३. आपल्या मागण्या, अडचणी तक्रारी इ. प्रशासनासमोर सनदशीर व शांततामय मार्गानेच सादर कराव्यात.

४. वर्गातील अध्यापन कार्यात व्यत्यय येईल असे वर्तन किंवा कृत्य करू नये.

५. रिकाम्या वेळेत व्हरांड्यात फिरू नये आणि गोंगाट करू नये. विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील अभ्यासिकेच्या सोयीचा लाभ घ्यावा.

६. वसतिगृह, महाविद्यालय आणि परिसरात कोणत्याही क्षणी आपली विचारणा केल्यास आपली ओळख पटवून देण्यास नकार देऊ नये आणि हुज्जत घालू नये.

७. संबंधित अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवागीशिवाय कोणत्याही स्वरुपाचा कार्यक्रम सभा, स्पर्धा सहल, वनभोजन अशा उपक्रमासाठी निधी संकलित करण्यात सहभागी होऊ नये. असे हे कृत्य अनधिकृत, नियमबाह्य मानले जाईल व ते दंडास पात्र ठरेल.

८. देशात किंवा अन्यत्र कुठेही विद्यार्थी किंवा त्यांच्या समूहामार्फत प्रतिनिधित्व करताना शासकीय अधिकारी किंवा विद्यापीठ किंवा महाविद्यालयाच्या व्यवस्थपनाशी संबंधित असलेल्या अधिकाऱ्यांव्यतिरिक्त इतर व्यक्तीसमोर प्रतिनिधित्व करताना विद्यापीठ महाविद्यालय किंवा तेथील संबंधित अधिकारी यांच्या नावांचा किंवा पत्यांचा गैरवापर करून नये.

९. वसतिगृह / महाविद्यालय / विद्यापीठ परिसरात कुलगुरु / महाविद्यालयात प्राचार्य यांच्या पूर्व व विशेष परवानगीशिवाय एखादी संघटना स्थापन करणे किंवा तिच्यात सहभाग घेणे किंवा तिची बैठक महाविद्यालयात आयोजित करणे किंवा विद्यार्थ्यांना संबोधित करणे हे गैरकृत्य मानले जाईल.

१०. संबंधित अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय एखादी खोली, दालन, कार्यालय, वर्गकक्ष, निवासस्थाने किंवा परिसरांचा भाग वापर करण्याच्या किंवा इतरांना करू देण्याच्या कृतीमध्ये सहभागी होऊ नये.

११. महाविद्यालयात किंवा विद्यापीठात प्रवेश घेण्यासाठी किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा गैरफायदा घेण्यासाठी, चुकीची विधाने करणे, चुकीची माहिती प्रस्तुत करणे, तसेच प्रमाणपत्र किंवा इतर कोणत्याही दस्ताऐवजांमध्ये अनाधिकृतरीत्या खाडाखोड करण्याच्या कृतीमध्ये सहभागी होऊ नये असे करणे हा गंभीर स्वरुपाचा गुन्हा ठरतो.

१२. वसतिगृह, महाविद्यालय आणि विद्यापीठ परिसरात शस्त्रास्त्रे, स्फोटके, रासायनिक, आम्ल पदार्थ, विष आणि विषारी पदार्थ, मादक पेये व गुंगी/नशा/झिंग आणणारे मद्यासारखे पदार्थ आणू नये/जवळ बाळगू नये/बाळगणाऱ्यांना सहकार्य करू नये.

१३. कुलगुरु/कुलसचिव/विद्यापीठातील इतर अधिकारी/महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी प्रतिबंधित केलेल्या कोणत्याही स्वरुपाच्या वस्तू किंवा साधने बाळगण्यात सहभागी होऊ नये. अशा प्रकारामध्ये कुलगुरु/ कुलसचिव व इतर अधिकारी/प्राचार्य प्रतिबंधित वस्तू ताब्यात घेतील. किंवा ताब्यात घेण्यासंबंधीचे आदेश देतील किंवा आवश्यकता भासल्यास त्या संबंधीची चौकशी होईपर्यंत अशा वस्तू/साधने ताब्यात ठेवतील.

१४. धूम्रपान, तंबाखू सेवन, मद्यपान, मादक द्रव्ये आणि गुंगी/नशा आणणाऱ्या पदार्थांचे सेवन निषेधार्ह मानले जाईल अशा स्वरुपांच्या वाईट व्यसनांना विद्यार्थ्यांनी बळी पडू नये.

१५. वसतिगृह/महाविद्यालय/विद्यापीठ परिसरात कोणत्याही स्वरुपाचे असभ्य/उद्धट वर्तन करू नये.

१६. वसतिगृह/महाविद्यालय/विद्यापीठ परिसरात विद्यार्थी, कर्मचारी, प्राध्यापक अधिकारी व अन्य कोणाशीही असभ्य वर्तन करू नये/अशा प्रयत्नात सहभागी होऊ नये.

१७. विद्यार्थ्यांच्या एका गटाला दुसऱ्या विद्यार्थ्यांने, प्राध्यापक किंवा प्रशासनाच्या विरोधामध्ये चिथावणी देऊ नये.

१८. वसतिगृह/महाविद्यालय/विद्यापीठ परिसरात किंवा बाहेर कोणत्याही स्वरुपाच्या हिंसक कृत्यांमध्ये सहभागी होऊ नये.

१९. वसतिगृह/महाविद्यालय/विद्यापीठ परिसरात किंवा बाहेर कोणत्याही विद्यार्थ्यांविरुध्द कसल्याही स्वरुपाची रॅगिंग करण्यामध्ये सहभागी होऊ नये. हा गंभीर स्वरुपाचा गुन्हा मानला जाईल.

२०. परराष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना छळणे, मानभंग करणे, तुच्छ लेखणे हे गैर आहे.

२१. दुसऱ्यांच्या स्वातंत्र्यावर आळा घालणे किंवा दुसऱ्यांचा अपमान करण किंवा शारीरिक छळ करणे किंवा निंदानालस्तीपर भाषा वापरणे अशा कृत्यात सहभागी होऊ नये.

२२. वसतिगृह/महाविद्यालय/विद्यापीठाच्या कार्यामध्ये बाहेरील व्यक्ती, संस्था किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तक्षेप करण्याच्या कृतीमध्ये सहभागी होऊ नये.

२३. वसतिगृह / महाविद्यालय / विद्यापीठ परिसरात किंवा परिसराच्याबाहेर राहून तेथील चांगल्या कार्याला किंवा कार्यपध्दतीला इजा पोहोचेल असे वर्तन करणे, अथवा विद्यार्थ्यांतील गट-गटात सुसंवाद साधून ज्ञानार्जन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वातावरण निर्मितीस बाधा आणण्याच्या कृतीमध्ये सहभागी होऊ नये.

२४. वसतिगृह महाविद्यालय/विद्यापीठाच्या साधनसंपत्तीच्या आणि मालमत्तेची नासधूस करण्याच्या किंवा विद्रूप करण्याच्या कृतीत सहभागी होऊ नये.

२५. वसतिगृह / महाविद्यालय / विद्यापीठ परिसरात कोणावरही हिंसक हल्ला करणे किंवा पाशवी बळाच्या जोरावर जबरदस्तीने परिसरात घुसून धिंगाना करणे हे गैरकृत्य आहे.

२६. महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय अधिकाऱ्यांनी नियुक्त केलेल्या पंचांनी, समित्यांनी दिलेल्या न्यायनिवाड्याचा आणि निर्णयाचा अनादर करू नये.

२७. विद्यापीठ किंवा महाविद्यालयाने आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये पंचांच्या, विरुध्द निंदानालस्तीपर भाषा वापरणे, टिंगल-टवाळी करणें किंवा शारीरिक छळ किंवा विक्षिप्त शारीरिक चाळे करणे हे गैरकृत्य मानले जाईल.

२८. महाविद्यालय/विद्यापीठवसतिगृहाच्या विद्यमाने आयोजिलेल्या क्रीडास्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम किंवा सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांत गैर व नियम-बाह्य कृतीमध्ये सहभागी होऊ नये.

२९. राजकीय पक्षांनी किंवा कोणत्याही संघटनांनी शासन किंवा महाविद्यालय किंवा विद्यापीठ किंवा इतर संघटनेविरुध्द आपला असंतोष व्यक्त करणाऱ्यांसाठी पुकारलेल्या बंदा/घेराव/रस्ता रोको/मोर्चा/निषेध सभा वगैरे मध्ये सहभागी होऊ नये.

३०. महापुरुषांचे पुतळे/देवीदेवता/प्रार्थनास्थळे यांची विटंबना केल्याच्या निषेधार्थ किंवा अन्य अशा कारणामुळे प्रक्षुब्ध होऊन महाविद्यालयातील/विद्यापीठातील अध्यापनकार्य बंद पाडू नये.

३१. कोणत्याही कारणास्तव अध्यापन कार्यावर सामुदायिक बहिष्कार घालू नये.सामुदायिक सुट्टी पाळू नये.

३२. महाविद्यालय/विद्यापीठाच्या अधिकार कक्षेतील वसतिगृहाच्या अधिक्षकाने केलेल्या नियमांचे व वेळोवेळी केलेल्या सूचनांचे आणि आदेशांचे पालन करावे.

३३. महाविद्यालय / विद्यापीठ परिसरात,पक्षीय / जातीय / धर्मांध / सांप्रदायिक स्वरुपांच्या हालचालीमध्ये सहभागी होऊ नये.

३४. संबंधित अधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय विद्यापीठ किंवा महाविद्यालयाच्या शिक्क्याचा/लेटरहेडचा वृत्तपत्रांना पत्रे पाठविण्यासाठी किंवा कोणत्याही स्वरुपाचा मजकूर प्रसृत करण्यासाठी किंवा तो मुद्रित करून वाटण्यासाठी उपयोग करू नये.

३५. कोणत्याही प्रकारच्या नैतिक अधःपतनाच्या कृतीमध्ये सहभागी होऊ नये.

३६. महाविद्यालय/विद्यापीठाच्या संबंधित अधिकाऱ्यांने अधिकृतपणे नियुक्त केलेल्या चौकशी समितीसमोर बोलावल्यास हजर राहावे व साक्ष द्यावी.

३७. कोणत्याही स्वरुपाच्या गैरकृत्यात आणि गैरवर्तनात सहभागी होऊ नये.

३८. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या अंतर्गत तयार केलेले अधिनियम, अध्यादेश आणि नियम यांचा भंग करण्याच्या कोणत्याही कृतीत सहभागी होऊ नये.

**३. विद्यार्थी आणि परीक्षा :**

१. विद्यार्थ्यांनी कोणत्याही परीक्षेत कसल्याही प्रकारच्या अनुचित व अवैध मार्गाचा अवलंब करू नये.

२. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना पूर्ण सहकार्य द्यावे.

३. परीक्षा संबंधित खालील नोंदविलेल्या कृतीमध्ये सामिल होऊ नये.

अ. परीक्षा दालनात कोणत्याही प्रकारचे मुद्रित, चक्रमुद्रित, टंकलिखित, हस्तलिखित, छायांकित, झेरॉक्स, साहित्य आणू नये.

ब. परीक्षा चालू असताना आपसात बोलू नये/आवाज करू नये.

क. उत्तरपत्रिका, पुरवणी उत्तरपत्रिका किंवा तिचा भाग दालनाबाहेर घेऊन जाऊ नये.

ड. पर्यवेक्षक, केंद्रप्रमुख, सहकेंद्रप्रमुख, प्राचार्य किंवा परीक्षेशी संबंधित कोणत्याही अधिकाऱ्यांशी उध्दट व आक्षेपार्ह वर्तन करण्याच्या कृतीमध्ये सामिल होऊ नये.

इ. पर्यवेक्षक, केंद्रप्रमुख, सहकेंद्रप्रमुख, प्राचार्य, किंवा परीक्षेशी संबंधित कोणत्याही अधिकाऱ्यांशी उध्दट व आक्षेपार्ह वर्तन करण्याच्या कृतीमध्ये सामिल होऊ नये.

ई. तोतया परीक्षार्थी परीक्षा दालनात बसविण्यासाठी प्रवेशपत्राचा (Admit Card) दुरुपयोग करू नये.

४. परीक्षा दालनात प्रवेश करण्यापूर्वी किंवा परीक्षा चालू असतांना परीक्षेशी संबंधित अधिकाऱ्यांने तपासणी केली तर त्याला विरोध करू नये.

५. परीक्षेशी संबंधित अधिकाऱ्यांनी अधिकृतरीत्या नियुक्त केलेल्या चौकशी समितीसमोर हजर राहावे व साक्ष द्यावी.

६. परीक्षेतील गैरप्रकारच्या संदर्भात विद्यापीठाने तयार केलेली शिक्षा सूची सर्व विद्यार्थ्यांना लागू राहील हे लक्षात घ्यावे.

**४. विद्यार्थी आणि प्राध्यापक :**

१. प्राध्यापकांचा आणि संबंधित अधिकाऱ्यांचा आदर करावा आणि एकंदर अध्यापन व्यवसायाचाच मान राखवा.

२. महाविद्यालय/विद्यापीठ परिसररात व बाहेर प्राध्यापक आणि संबंधित अधिकाऱ्यां विषयी बोलताना/ चर्चा करताना आदरपूर्वक उल्लेख करावा.

३. वर्गबंधू आणि भगिनींनी या संदर्भात प्राध्यापकांसमोर आणि विशेषतः प्रशासनासमोर बेछूट आरोप किंवा निंदानालस्ती करु नये.

४. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांशी प्राध्यापकाप्रमाणेच आदराने वागावे व त्यांच्याशी नम्रतापूर्वक बोलावे.

५. महाविद्यालय/विद्यापीठातील एखाद्या विद्यार्थ्याविषयी अश्लील, गलिच्छ, अपमानित व चारित्र्यहनन करणारा मजकूर फळ्यावर, भिंतीवर किंवा परिसरात कुठेही लिहू नये.

६. मुलींचा विनयभंग हा अक्षम्य स्वरुपाचा गुन्हा मानला जाईल.

**५. विद्यार्थी आणि समाज :**

१. सामाजिक आरोग्याच्या व प्रगतीच्या दृष्टीने प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विविध प्रकारचे सामाजिक प्रश्न समजून घ्यावे आणि विविध स्वरुपाच्या सामाजिक उपक्रमांत सहभागी व्हावे.

२. प्राध्यापकांच्या मार्गदर्शन व निरीक्षणाखाली सामाजिक सेवेच्या कार्यात सहभागी व्हावे. व्यसनमुक्ती व अंधश्रध्दा निर्मूलनासाठी प्रयत्न करावे आणि स्वतःचा, समाजाचा नैतिक व बौध्दिक विकास करावा.

३. प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली निरक्षरता, अंधश्रध्दानिर्मूलन, पर्यावरण, वृक्षारोपण यांसारख्या उपक्रमांसाठी आवश्यक सहकार्य करावे, तसेच इतर मान्यताप्राप्त अभियानांत आपल्या प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली योगदान द्यावे.

४. समाजातील ज्येष्ठ व वडीलधाऱ्या व्यक्तींचा आणि विशेषत्वाने महिलावर्गाचा आदर राखावा.

५. विविध समाजघटक, धार्मिक किंवा भाषिक समूहांमध्ये व्देषभाव किंवा शत्रुत्व निर्माण होऊ शकेल अशा कोणत्याही कृत्यामध्ये सामील होऊ नये. या उलट आपल्या प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली सर्व समाजघटकांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढविण्याच्या कामी क्रियाशील राहावे.

**६. विद्यार्थी आणि पालक :**

१. विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक प्रगतीची व प्रश्नांची माहिती आपल्या पालकांना वेळोवळी कळवावी.

२. विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना महाविद्यालयातील/विद्यापीठातील शैक्षणिक उपक्रमांबाबत चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देऊ नये.

३. पालकांनी महाविद्यालय/विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांकडून आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीविषयी माहिती मिळवावी. आपल्या पाल्याच्या प्रगतीकडे त्यांनी जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

**७. दंड/शिक्षा किंवा दंडात्मक कार्यवाही**

विद्यार्थ्यांसाठी असलेल्या वर्तन आणि शिस्तीच्या अटी व नियमांचे उल्लंघन झाल्यास कोणताही विद्यार्थी त्याच्या गैरवर्तनासाठी किंवा नियमबाह्य कृतीसाठी खाली निर्देशित केलेल्या एक किंवा अनेक दंडात्मक कार्यवाही अंतर्गत शिक्षा भोगण्यास पात्र राहील.

१. विद्यार्थ्यांकडून कुठल्याही गैरकृत्यांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून सक्त ताकीद देणे.

२. प्रवेश रद्द करणे.

३. प्रवेश रद्द करुन पुढील प्रवेशास प्रतिबंध करणे.

४. शैक्षणिक सत्र रद्द करणे.

५. विद्यापीठ परीक्षेचे आवेदनपत्र रोखून धरणे किंवा रद्द करणे.

६. महाविद्यालय, संस्थेचे वसतिगृह किंवा निवास कक्षांतून निश्चित कालावधीसाठी काढून टाकणे. मात्र हा कालावधी पाच वर्षांपेक्षा अधिक असणार नाही.

७. महाविद्यालयातून काढून टाकणे.

८. तीनशे रुपये पर्यंतचा दंड आकारणे.

९. फी किंवा अनामत रक्कम परत न करणे.

१०. जीमखाना, ग्रंथालय आणि इतर सवलतींचा विशिष्ट कालावधीसाठी लाभ घेण्यास मज्जाव करणे.

११. नादारी, शिष्यवृती, इतर सवलती आणि आर्थिक मदतीचे फायदे रद्द करणे.

१२. विद्यापीठाअंतर्गत चालणाऱ्या महाविद्यालय किंवा संस्थेच्या आणि विद्यापीठाच्या कोणत्याही परीक्षेला बसण्यासाठी विशिष्ट कालावधीकरिता मज्जव करणे, मात्र हा कालावधी पाच वर्षांपेक्षा अधिक नसेल.

१३. गैरप्रकाराचे स्वरूप लक्षात घेऊन कोणतीही कार्यवाही करणे.

**८. संहिता दुरुस्ती :**

विद्यार्थी आचार व अनुशासन संहितेस विद्यापीठ आवश्यकतेनुसार बदल/दुरुस्ती करील.

## रॅगिंग प्रतिबंधक अधिनियम

रॅगिंग करणे हा कायद्यानुसार गुन्हा आहे. रॅगिंगच्या वाढत्या घटनांमुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने २००९ मध्ये रॅगिंग करणाऱ्याला कठोर शिक्षेची तरतूद असलेला अधिनियम प्रसारित केला. रॅगिंगसंदर्भात या विद्यापीठात रॅगिंग प्रतिबंधक समिती स्थापन करण्यात आली असून या अधिनियमाची कठोर अंमलबजावणी विद्यापीठात केली जाणार आहे. रॅगिंग हा दुसऱ्या विद्यार्थ्याला शारीरिक किंवा मानसिक क्लेष होईल असे वर्तन करण्याचा एक घृणास्पद अमानवी व विकृत प्रकार आहे. रॅगिंगमुळे निष्पाप विद्यार्थ्याचे खच्चीकरण तर होतेच, परंतु रॅगिंगमुळे प्रसंगी एखादा विद्यार्थी प्राणासही मुकू शकतो. रॅगिंगमध्ये खालील बाबींचा अंतर्भाव होतो.

नवप्रवेशित विद्यार्थ्याला बोलून, लिहून, चिडवून, उध्दटपणे वागून त्याला/तिला मानसिक किंवा शारीरिक इजा पोहचविणे.

इतरांची मानहानी करणारे व लज्जा उत्पन्न करणारे वर्तन करणे.

नवप्रवेशित विद्यार्थ्यांवर वरिष्ठत्वाच्या नात्याने जोरजुलूम करणे, दहशत उत्पन्न करणे, सत्ता प्रस्थापित करणे, त्यांना शिक्षा देणे इ.

प्रत्यक्ष-अपत्यक्षपणे इतर विद्यार्थ्यांना त्रास देणारी कोणतीही कृती करणे.

रॅगिंग करणाऱ्याला शिक्षा : या अधिनियमात रॅगिंग करणाऱ्या विद्यार्थ्याला कठोर शिक्षेची तरतूद आहे. दोषी विद्यार्थ्याला खालीलपैकी एक अथवा अधिक शिक्षेस सामोरे जावे लागेल.

- वर्गात बसणे व इतर शैक्षणिक लाभांपासून वंचित करणे.
- शिष्यवृत्ती, फेलोशिप यापासून वंचित करणे.
- परीक्षेसाठी अपात्र ठरविणे.
- निकाल राखून ठेवणे.
- कोणत्याही युवक महोत्सव, टुर्नामेंटमध्ये सहभागास प्रतिबंध करणे.
- एक ते चार सत्रांपर्यंत निलंबित करणे.
- शिक्षणसंस्थेतील प्रवेश रद्द करणे तसेच कोणत्याही शिक्षणसंस्थेत काही
- काळासाठी प्रवेशापासून वंचित करणे.
- आणीबाणीच्या प्रसंगी विद्यार्थी/विद्यार्थिनींनी रॅगिंग प्रतिबंधक समितीकडे संपर्क साधावा.

## Anti Ragging Regulation

Ragging is legally banned. It is punishable offence. In view of the increasing number of events of ragging, the University Grants Commission has passed the "UGC Regulations on Curbing the Menace of Ragging in Higher Educational Institutions, Ragging is any mis-conduct by" any student or students whether by words spoken or written or by an act which has the effect of teasing, treating or handling with rudeness a fresher or any other student, or including in rowdy or in disciplined activities by any student which causes or is likely to cause annoyance, hardship or psychological harm or to raise fear or apprehension thereof in any fresher or any other student or asking any student to do any act which such student will not in any ordinary course do and which has the effect of causing or Generating a sense of shame, or torment or embarrassment so as to adversely affect the physique or psyche of such fresher or any other student, with or without intent to derive a sadistic pleasure or showing of power, authority or superiority by a student over any fresher or any other student".

The Anti-Ragging Committee may, depending on the nature and gravity of the guilt established by the Anti-Ragging squad, award, to those found guilty, one or more of the following punishments namely :

1. Suspension from attending classes and academic privileges.
2. Withholding/withdrawing scholarship/fellowship and other benefits.
3. Debarring from appearing in any test/examination or other evaluation process
4. Withholding results.
5. Debarring from representing the institutions in any regional, national or international meet, tournament, youth festival etc.,.

6. Suspension / expulsion from the hostel.
7. Cancellation of admission.
8. Rustication from the institution for period ranging from one to six semesters.
9. Expulsion from the institution and consequents debarring from admission to any other institution for a specified period.

Provided that where the persons committing or abetting the act of ragging are not identified the institution shall resort to collective punishment.

Students are advised to consult the Anti Ragging Committee in case of emergency.

## ANNEXURE I
## AFFIDAVIT BY THE STUDENT

1) I, (full name of student with admission/registration/enrolment number) s/o d/o Mr./ Mrs./Ms. ______________________________ , having been admitted to (name of the institution) , have received a copy of the UGC Regulations on Curbing the Menace of Ragging in Higher Educational Institutions, 2009, (hereinafter called the "Regulations") carefully read and fully understood the provisions contained in the said Regulations.

2) I have, in particular, perused clause 3 of the Regulations and am aware as to what constitutes ragging.

3) I have also, in particular, perused clause 7 and clause 9.1 of the Regulations and am fully aware of the penal and administrative action that is liable to be taken against me in case I am found guilty of or abetting ragging, actively or passively, or being part of a conspiracy to promote ragging.

4) I hereby solemnly aver and undertake that

a) I will not indulge in any behaviour or act that may be constituted as ragging under clause 3 of the Regulations.

b) I will not participate in or abet or propagate through any act of commission or omission that may be constituted as ragging under clause 3 of the Regulations.

5) I hereby affirm that, if found guilty of ragging, I am liable for punishment according to clause 9.1 of the Regulations, without prejudice to any other criminal action that may be taken against me under any penal law or any law for the time being in force.

6) I hereby declare that I have not been expelled or debarred from admission in any institution in the country on account of being found guilty of, abetting or being part of a conspiracy to promote, ragging; and further affirm that, in case the declaration is found to be untrue, I am aware that my admission is liable to be cancelled.

Declared this _______day of __________ month of _________year.

___________________
Signature of deponent

Name:

**VERIFICATION**

Verified that the contents of this affidavit are true to the best of my knowledge and no part of the affidavit is false and nothing has been concealed or misstated therein.

Verified at (place) on this the (day) of (month) , (year) .

___________________
Signature of deponent

Solemnly affirmed and signed in my presence on this the (day) of (month), (year) after reading the contents of this affidavit.

OATH$COMMISSIONER

ANNEXURE II

AFFIDAVIT BY PARENT/GUARDIAN

1) I, Mr./Mrs./Ms. ______________________________________________ (full name of parent/guardian) father/mother/guardian of, (full name of student with admission/registration/enrolment number), having been admitted to ___(name of the institution), have received a copy of the UGC Regulations on Curbing the Menace of Ragging in Higher Educational Institutions, 2009, (hereinafter called the "Regulations"), carefully read and fully understood the provisions contained in the said Regulations.

2) I have, in particular, perused clause 3 of the Regulations and am aware as to what constitutes ragging.

3) I have also, in particular, perused clause 7 and clause 9.1 of the Regulations and am fully aware of the penal and administrative action that is liable to be taken against my ward in case he/she is found guilty of or abetting ragging, actively or passively, or being part of a conspiracy to promote ragging.

4) I hereby solemnly aver and undertake that

a) My ward will not indulge in any behaviour or act that may be constituted as ragging under clause 3 of the Regulations.

b) My ward will not participate in or abet or propagate through any act of commission or omission that may be constituted as ragging under clause 3 of the Regulations.

5) I hereby affirm that, if found guilty of ragging, my ward is liable for punishment according to clause 9.1 of the Regulations, without prejudice to any other criminal action that may be taken against my ward under any penal law or any law for the time being in force.

6) I hereby declare that my ward has not been expelled or debarred from admission in any institution in the country on account of being found guilty of, abetting or being part of a conspiracy to promote, ragging; and further affirm that, in case the declaration is found to be untrue, the admission of my ward is liable to be cancelled.

Declared this ______day of __________ month of ______year.

Signature of deponent

Name:

Address:

Telephone/ Mobile No.:

VERIFICATION

Verified that the contents of this affidavit are true to the best of my knowledge and no part of the affidavit is false and nothing has been concealed or misstated therein.

Verified at (place) on this the (day) of (month) , (year) .

Signature of deponent

Solemnly affirmed and signed in my presence on this the (day) of (month), (year ) after reading the contents of this affidavit.

OATH$COMMISSIONER

## लाल बहादुर शास्त्री महाविद्यालय धर्माबाद, जि.नांदेड

### वरिष्ठ महाविद्यालय कर्मचारी

**वनस्पतिशास्त्र**

डॉ. दिंगंबर मोरे (वि.प्र.)
(प्राचार्य)

प्रा. डॉ.सौ. प्रसन्नाराणी तन्नीरू

**प्राणिशास्त्र**

प्रा.डॉ.श्रीनिवास भूपलवार (वि.प्र.)

**रसायनशास्त्र**

प्रोफेसर डॉ.शिवाजी पटवारी (वि.प्र.)

प्रा.डॉ. नितेश कामीनवार

प्रा.श्रीनिवास नक्कलवार

प्रा.डॉ. हनमंत कासराळीकर

**गणित**

प्रा.कुलदीपक गच्चे (वि.प्र.)

**पदार्थविज्ञान**

प्रा.डॉ. अनिल टाक (वि.प्र.)

प्रा.डॉ. कमलाकर कणसे

**इलेक्ट्रॉनिक्स**

प्रा.डॉ. अमरसिंह चौहान (वि.प्र.)

प्रा.डॉ. योगेश जोशी

**संगणकशास्त्र विभाग**

**(–)**

**वाणिज्य**

प्रा.राजेंद्र साळी (वि.प्र.)

**ग्रंथालय**

प्रा.डॉ. शरद चव्हाण

**मराठी**

डॉ. श्रीराम गव्हाणे (वि.प्र.)
(उप-प्राचार्य)

**हिंदी**

प्रा.डॉ.कु.प्रतिभा येरेकार (वि.प्र.)

प्रा. साईनाथ कोरेबाईनवाड

**इंग्रजी**

प्रा.डॉ.सौ. सुशीला पुडोटा (वि.प्र.)

प्रा.संभाजी मनूरकर

**अर्थशास्त्र**

प्रा.रामराव शेवलीकर (वि.प्र.)

**राज्यशास्त्र**

प्रा.डॉ. प्रभाकर जाधव (वि.प्र.)

प्रा.महिपाल सुळे

**लोकप्रशासन**

प्रा.डॉ.गोविंद यमलवाड (वि.प्र.)

प्रा.डॉ. शिवाजी जाधव

**इतिहास**

प्रा.डॉ. सुनील सोनकांबळे (वि.प्र.)

प्रा.डॉ. सुदर्शन क्षेत्री

**शारीरिक शिक्षण**

प्रा.डॉ.उदय चव्हाण (वि.प्र.)

प्रा.अब्दुल माजीद

### कनिष्ठ महाविद्यालय कर्मचारी

**इतिहास विभाग**

कु. वसुंधरा वडवळकर (उप-प्राचार्य)

**मराठी विभाग**

श्री. संजय जिडगे

श्री. नारायण वाडीयार

**पदार्थविज्ञान विभाग**

श्री. कृष्णा कुलकर्णी

डॉ. दुर्गाप्रसाद रांदड

श्री. सचिन शिंदे

| | |
|---|---|
| **हिंदी विभाग** | **रसायनशास्त्र विभाग** |
| श्री. सुधाकर कासरलावाड | श्री. अमृता वानखेडे |
| श्री. माधव शिवशेट्टे | श्री. रहिमोद्दीन शेख |
| श्री. अरविंद बोधनकर | |
| **राज्यशास्त्र विभाग** | **जीवशास्त्र विभाग** |
| डॉ. बालाजी श्रीगिरे | कु. सुष्मा पल्लेवाड |
| श्री. अविनाश कुलकर्णी | |
| **शारीरिक शिक्षण विभाग** | **मानसशास्त्र विभाग** |
| श्री. विष्णू जाधव | श्री. बाळू काळे |
| **वाणिज्य विभाग** | **गणित विभाग** |
| श्री. संदीप पांचाळ | श्री. सतीश गर्दसवार |

**कार्यालयीन कर्मचारी**

श्री विलास झंपलवाड (प्रभारी अधीक्षक), श्री आनंद तोटेवाड (मुख्य लिपीक), श्री गणेश जाधव (वरिष्ठ लिपीक), डॉ. रिंकु नक्का (वरिष्ठ लिपीक), श्री व्यंकटेश पालकृतवार (ग्रंथालय लिपीक), श्री मारोती जगदंबे (कनिष्ठ लिपीक),श्री चिमनाजी ताडोड (प्रयोगशाळा सहाय्यक), कु. वर्षा मेडेवार (प्रयोगशाळा सहाय्यक), श्री. आनंद सारडा (प्रयोगशाळा सहाय्यक)

**सेवक वर्ग**

नंदकिशोर रापतवार, देविदास आडेराव, महादू मिरदोडे, गंगाधर कुंठेवाड, दिगंबर हनमोड, महमद युनूस, दिगंबर छपरे, सुभाष गोजे, राजेश्वर कोत्तावार, महमद अनवर, राजेश गोविंदलवार, रामलू कनकमवार, मारोती म्हैसे, गोरोबा कुरुंदे, नारायण आडेराव, संतोष मुलकोड, संजय जाधव, सुरेश भद्रे, विक्रम शेळके, बालाजी गंटोड, मारोती डेबेकर, शंकर लखमवाड, चंद्रकांत कदम, श्रीनिवास गोरजे, संजय गुर्जलवार